**सुविचार**
मधुमक्खी की तरह गुणों
रूपी मिठास एकत्र करते रहें ।
(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक
# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/गुरुवार दि. ७ मार्च २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-११४ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## देशातील पहिली अंडरवॉटर मेट्रो
### पंतप्रधानांच्या हस्ते झाले उद्घाटन




कोलकाता : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात भारतात अनेक विकासकामे राबवण्यात आली. अटल सेतू , सुदर्शन सेतू , मेट्रो आणि बुलेट ट्रेन , तसेच वंदे भारत ट्रेन यांसारखे लोकांना अत्यंत सोयीचे पर्याय आणि देशाला विकसिततेकडे नेणारे मार्ग मोदी सरकारच्या काळात आले. यासोबतच आता देशातील पहिली अंडरवॉटर मेट्रो धावणार आहे. याचे उद्घाटन आज कोलकात्यामध्ये पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते पार पडले.

पंतप्रधान मोदी आज पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी पश्चिम बंगालच्या जनतेसाठी विविध प्रकल्पांचं लोकार्पण आणि उद्घाटने केली. यावेळेस त्यांनी कोलकाताच्या हुगळी नदीतील बोगद्यातून धावणाऱ्या देशातील पहिल्या अंडरवॉटर मेट्रोला हिरवा कंदील दाखवला.

ही पाण्याखालील मेट्रो बोगदा हावडा मैदान-एस्प्लेनेड विभागादरम्यान धावेल. कोलकाता मेट्रो हावडा मैदान-एस्प्लेनेड बोगदा हा भारतातील नदीखाली बांधला जाणारा पहिला वाहतूक बोगदा आहे. काही दिवसांपूर्वीच रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी कोलकाता मेट्रो रेल्वे सेवांचा आढावा घेतला होता आणि आज पंतप्रधान मोदींनी पहिल्या पाण्याखालील मेट्रो सेवेचं लोकार्पण केलं आहे.

पंतप्रधानांनी केला अंडरवॉटर मेट्रोने प्रवास

पंतप्रधान मोदी यांनी अंडरवॉटर मेट्रोचं उद्घाटन केल्यानंतर त्यातून प्रवासही केला. या प्रवासादरम्यान त्यांनी शालेय **(पान ७ वर)**

विचारपूर्वक विधाने करा
## राहुल गांधींना निवडणूक आयोगाचा सल्ला



नवी दिल्ली: निवडणूक आयोगाने काँग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधींना सल्ला दिला आहे की त्यांनी विचारपूर्व विधाने करावीत.निवडणूक आयोगाने राहुल गांधींसाठी दिशानिर्देश जारी केले आहेत. राहुल गांधींनी काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींबद्दल अपमानजनक विधाने केली होती.

लवकर लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. त्यामुळे सर्वच पक्ष प्रचाराला सुरूवात करतील. अशातच केंद्रीय निवडणूक आयोगाकडून काँग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधींसाठी खास दिशानिर्देश जाहीर करण्यात आले आहेत.

यात त्यांना निवडणूक आयोगाने कोणत्याही प्रकारची विधाने करताना ती विचारपूर्वक करावीत, वादग्रस्त टीकाटिप्पणी करू नये असा सल्ला दिला आहे. हे दिशानिर्देश १ मार्चला जारी करण्यात आले होते. यात निवडणूक आयोगाने सूचना दिली होती की पक्ष, उमेदवार तसेच स्टार प्रचारकांनी कोणत्याही प्रकारे आचारसंहितेचे उल्लंघन केल्यास त्यांना मोठ्या कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

यात असेही म्हटले आहे की ज्या स्टार प्रचारक तसेच उमेदवारांना आधीच नोटीस मिळाली **(पान ७ वर)**



## बेस्ट ऑफ आशा पुस्तकाचे अमित शाह यांच्या हस्ते प्रकाशन

मुंबई : महाराष्ट्र भूषण प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांच्या फोटो बायोग्राफी पुस्तकाचे प्रकाशन आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते सह्याद्री अतिथी गृह येथे करण्यात आले.

प्रसिद्ध छायाचित्रकार गौतम राजाध्यक्ष यांनी आशाताईंच्या टिपलेल्या छायाचित्रांचे मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार ॲड आशिष शेलार यांच्या पुढाकाराने, संकल्पनेतून आणि व्हॅल्युएबल ग्रुप च्या सहयोगाने बेस्ट ऑफ आशा हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. आशा भोसले यांच्या विविध भावमुद्रा आणि वेगवेगळ्या छायाचित्रातून त्यांचे जीवन आणि गाणे या पुस्तकातून उलघडण्यात आला आहे. सुमारे ४२ विविध छायाचित्रे आणि त्या क्षणाच्या काही आठवणी यांची अत्यंत देखण्या स्वरूपात मांडणी असलेला हा एक मौल्यवान दस्तऐवजच ठरावे अशी पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे.

मुंबई दौऱ्यावर असणाऱ्या केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आणि आशा भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत सह्याद्री अतिथी ग्रहावर आज सकाळी या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाला मुंबई **(पान ७ वर)**

## घनसरगाव - रेणापूर रस्त्यावरील रेणा नदीवरच्या नवीन पुलाचे आ. कराड यांच्या हस्ते लोकार्पण



लातूर / प्रतिनिधी- रेणापूर तालुक्यातील मौजे घनसरगाव ते रेणापूर रस्त्यावरील नव्याने बांधण्यात आलेल्या दीड कोटीहून अधिक रुपये खर्चाच्या रेणा नदीवरील पुलाचे लोकार्पण भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते मंगळवारी सायंकाळी करण्यात आले. पुलाच्या उभारणीमुळे अनेकांची मोठी गैरसोय दूर झाली आहे उद्घाटनाच्या निमित्ताने फटाके फोडून मोठ्या उत्साहाच्या वातावरणात आ कराड यांचे स्वागत केले.

यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, संगायो समिती अध्यक्ष वसंत करमुडे, भाजपाचे सतीश आंबेकर, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, माजी सभापती रमेश सोनवणे, माजी उपसभापती आनंत चव्हाण, रामराव मोरे, श्रीकृष्ण जाधव, शीला आचार्य, अनुसया फड, लक्ष्मण जाधव, श्रीमंत नागरगोजे, घनसरगावच्या सरपंच महानंदा दरेकर, उपसरपंच विमलबाई कापसे, शरद दरेकर, अच्युत कातळे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

घनसरगाव येथील नागरिकांना रेणापूर अथवा लातूरला जाण्यासाठी पानगाव रस्त्याने जावे लागत असे. या रस्त्यावरून घनसरगाव ते रेणापूर दरम्यानचे अंतर ८ ते १० किलोमीटर असून रेणा नदीवर पुलाचे काम पूर्ण झाल्याने वेळेच्या बचतीबरोबरच प्रवासाचे अंतरही मोठ्या प्रमाणात कमी होऊन घनसरगाव पासून अवघ्या साडेतीन ते चार किलोमीटर अंतर रेणापूरचा प्रवास झाला आहे. रेणा नदीवर पुल व्हावा अशी अनेक वर्षापासून घनसरगावकरांची असलेली मागणी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून राज्य शासनाने पूर्ण केली आहे.

रेणा नदीवरील १ कोटी ६१ लक्ष रुपये खर्चाच्या पुलाचे लोकार्पण भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते मंगळवारी सायंकाळी करण्यात आले. यावेळी फटाके फोडून मोठ्या उत्साहाच्या आणि आनंदाच्या वातावरणात आ. कराड यांचे स्वागत करण्यात आले. घनसरगाव येथील ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला, त्याचबरोबर स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच पन्नास लाख रुपये खर्चाचा रस्ता मंजूर केल्याबद्दल घनसरगाव तांडा येथील नागरिकांनी आ. कराड यांचा सत्कार करून आभार व्यक्त केले.

वर्षानुवर्ष दुर्लक्षित असलेले मतदार **(पान ७ वर)**

## संभाव्य पाणी टंचाई निवारण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे



लातूर, /प्रतिनिधी जिल्ह्यातील संभाव्य पाणी टंचाई विचारात घेवून सर्व संबंधित विभागांनी पाणी पुरवठ्याचे सूक्ष्म नियोजन करावे. आरक्षित पाणी साठ्याचा अवैध उपसा होवू नये, यासाठी तातडीने कार्यवाही करावी. यामध्ये हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. तसेच जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली पाणी टंचाई आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

लातूर शहरातील पाणी पुरवठा सुरळीत सुरु राहण्यासाठी प्रत्येक वार्डनिहाय पाणी पुरवठ्याचे नियोजन होणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक क्षेत्रीय अधिकाऱ्याने पाणी पुरवठ्याचे वेळापत्रक तयार करावे. शहरातील पाणी पुरवठ्याचे शासकीय स्त्रोत, जलवाहिनी यांचे सर्वेक्षण करून स्त्रोतांची सद्यस्थिती **(पान ७ वर)**






# मूलभूत रसायनशास्त्राचे ज्ञान वृद्धिंगत करण्याची आवश्यकता : प्रा.आनंद पाठक



लातूर : जगाच्या पाठीवर भारतीय संस्कृती ही सर्वश्रेष्ठ असून प्रत्येक विद्यार्थ्यांनी मातृदेवो भव,पितृदेवो भव आणि आचार्य देवोभव या शिकवणीप्रमाणे जीवनात आचरण केले पाहिजे. आई-वडील गुरुजनांचा आदर करीत भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्याप्रमाणे विनम्रपणे वागलं पाहिजे.पीएच.डी.पदवी प्राप्त केली म्हणजे सर्व शिक्षण संपले असे नाही. कारण शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. म्हणूनच विद्यार्थ्यांनी मूलभूत रसायनशास्त्राचे अद्ययावत ज्ञान जास्तीत-जास्त वृद्धिंगत करण्याची आवश्यकता आहे,असे प्रतिपादन हैदराबाद विद्यापीठातील स्कूल ऑफ फिजिक्सचे माजी प्रा.आनंद पाठक यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेस,बेंगळुरू,आयएनएसए, नवी दिल्ली आणि एनएएसआय, प्रयागराज यांच्या संयुक्त विद्यमाने दि.०५ व ०६ मार्च २०२४ या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान अकादमीच्या म मूलभूत रसायनशास्त्र म या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन झाले.यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड होते.याप्रसंगी रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.युवराज सारणीकर,कार्यशाळा समन्वयक डॉ.नंदिनी कोरडे,प्रा.राहुल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड असे म्हणाले की,महाविद्यालयात विद्यार्थी,प्राध्यापक यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कार्यशाळा,सेमिनार,रिफ्रेशर कोर्सेस व विविध उपक्रमांचे आयोजन सातत्याने केले जाते.याचाच भाग म्हणून रसायनशास्त्राचे मूलभूत ज्ञान विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे.कार्यशाळेतील तज्ज्ञ मार्गदर्शक,वैज्ञानिकांच्या अद्ययावत ज्ञानातून विद्यार्थी घडला पाहिजे व त्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी झाला पाहिजे,या उद्देशातून ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

प्रास्ताविक कार्यशाळा समन्वयक डॉ.नंदिनी कोरडे यांनी केले तर आभार प्रा.राहुल जाधव यांनी मानले.सूत्रसंचालन विद्या नागटिळक व विदुला राजमाने यांनी संयुक्तरित्या केले. याप्रसंगी डॉ.रवी सोळुंके, डॉ.श्रेयश माहुरकर,डॉ.रवींद्र शिंदे,डॉ.विजेंद्र चौधरी,डॉ. विश्वनाथ मोटे,डॉ.टी. एच.मुजावर,डॉ.ईन्नूस पठाण,प्रा.नवनाथ ढेकणे,डॉ. रामशेट्टी शेटकार,प्रा.मेघा आत्राम,प्रा.मनीषा मुंडे,प्रा.भाग्यश्री काळे,प्रा. अच्युत शिंदे,प्रा.डावरे यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## दयानंद वाणिज्य मध्ये नव मतदार नोंदणी अभियानास प्रारंभ

लातूर / प्रतिनिधी- भारत निवडणूक आयोग, स्वा. रा. ती. म. वि., नांदेड, जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय लातूर, वर्शीप अर्थ फाउंडेशन, नेहरू युवा केंद्र, लातूर व दयानंद वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील १८ ते १९ वयोगटातील विद्यार्थ्यांची १००% मतदार नोंदणी करण्यासाठी नव मतदार नोंदणी अभियान दि. ०५ मार्च २०२४ ते ७ मार्च २०२४ या कालावधीमध्ये महाविद्यालयामध्ये संपन्न होणार होत आहे, त्याचा आज महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. राजाराम पवार सर यांच्या हस्ते शुभारंभ झाला. मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदार नोंदणी आवश्यक असल्याची माहिती विद्यार्थ्यांना देऊन आपली नोंदणी या उपक्रमांतर्गत करून घेण्याचे आवाहन प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना यावेळी केले. यावेळी नेहरू युवा केंद्राचे प्रतिनिधी प्रशांत साबणे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. बालाजी कांबळे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.मनीषा अष्टेकर, कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा, लेफ्टनंट डॉ. साईनाथ उमाटे, निवडणूक साक्षरता मंडळ नोडल ऑफिसर प्रा. अक्षय पवार, प्रा. योगेश शर्मा, प्रा. अजय चव्हाण, प्रा.दीपक सूर्यवंशी उपस्थित होते. या उपक्रमासाठी प्रा. लता जाधव, प्रा. कृष्णाई पाचंगे, गौरी मामडगे, वैष्णवी दबडगावकर, मुस्कान शेख, काळे पौर्णिमा, गजानन मिश्रा, हरीश चांडक, कु.जोगिरे वर्षा, स्वामी ओमकार, स्वप्नाली जाधव, बालाजी कनगुळे आदी परिश्रम घेत आहेत.

# मनपाच्या ३० कोटींच्या विकास कामांच्या कोटेशन प्रक्रियेस तातडीने स्थगिती द्यावी

### माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांचे मनपा आयुक्तांना निवेदन

लातूर / प्रतिनिधी- लातूर शहर महानगरपालिकेस जिल्हा नियोजन समिती द्वारा विविध योजना अंतर्गत सुमारे ३० कोटींच्या विकास कामांचे तुकडे पाडून मर्जीतील कंत्राटदारांना कामे देण्याकरिता ई निविदा प्रक्रिया टाळून काढण्यात आलेल्या कोटेशन प्रक्रियेस स्थगिती द्यावी अशी तक्रार काही दिवसांपूर्वी लातूरचे माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी केलेली होती. परंतु यावर कार्यवाही करण्यास मनपा प्रशासनाकडून कार्यवाहीस टाळाटाळ करण्यात येत होती परंतु मागील दोन दिवसांत मनपा मध्ये कोटेशन वाटपात झालेल्या अनागोंदी कारभाराच्या पार्श्र्वभूमीवर त्यांनी केलेली तक्रार सिद्ध होत आहे. यामुळे या कोटेशन प्रक्रियेस तत्काळ स्थगिती द्यावी असे निवेदन माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी मनपा आयुक्तांना दिले आहे.

लातूर शहर महानगरपालिकेस जिल्हा नियोजन समिती द्वारा लोकसंख्येच्या निकशावर सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तर योजना, नागरी दलितेतर वस्ती विकास योजना, अण्णाभाऊ साठे अनुसूचित जाती व नवबौध्द वस्ती सुधार योजना अंतर्गत सुमारे ३० कोटींचा निधी वितरित करण्यात आले आहेत. परंतु या निवडलेल्या विकास कामांमध्ये ई निविदा टाळण्यासाठी एकाच भागातील विकास कामांचे तुकडे पाडून मनपाकडून कोटेशन प्रक्रिया राबविण्यात येत आहे. याद्वारे विशिष्ठ कंत्राटदारांना फायदा मिळवून देण्यासाठी हा घाट घातला असल्याचा आरोप लातूरचे माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी केलेला आहे. याबाबतची रीतसर तक्रार दाखल करून अनियमितता निदर्शनास आणून दिली होती परंतु मनपा प्रशासनाकडून या अनागोंदी कारभारावर कार्यवाही करण्यास टाळाटाळ करण्यात येत होती. मात्र मागील दोन दिवसात मनपा मध्ये झालेल्या गोंधळामुळे या तक्रारीतील सत्य समोर येत आहे. काही विशिष्ठ पक्षाचे अध्यक्ष हे मनपा अधिकारी यांना हाताला धरून विशिष्ठ कंत्राटदारांना कामे वाटप करीत असल्याने मोठा गोंधळ निर्माण झाला. या सर्वांची दखल घेवून मनपा आयुक्तांना तातडीने या कोटेशन प्रक्रियेस तत्काळ स्थगिती द्यावी असे निवेदन माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी मनपा आयुक्तांना दिले आहे.

### मनपाच्या अनागोंदी कारभारा विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल

विकास कामांच्या ई निविदा न काढता राबविण्यात येणारी कोटेशन प्रक्रिया ही शासन नियमाचे उल्लंघन करणारी असल्याने या प्रकरणी आक्रमक पवित्रा घेत माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी औरंगाबाद उच्च न्यायालयात याचिका देखील दाखल केलेली असून पुढील सुनावणी ८ मार्च रोजी होणार आहे. आज या याचिकेची प्रत देखील त्यांनी मनपा आयुक्तांना देवून पुढील कार्यवाही थांबविण्याचे आवाहन केले आहे.

# रावणकोळा येथे स्वीप कार्यक्रम अंतर्गत मतदार जागृती रॅली



अतनूर / प्रतिनिधी- भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदान प्रक्रियेमध्ये जळकोट तालुक्यातील अतनूर परिसरातील व रावणकोळा, हळदवाढवणा मतदारांचा सहभाग आढावा, मतदारांना मतदानाचे महत्त्व व आवश्यकता यांची जाणीव व्हावी यासाठी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने उदगीर विधानसभा मतदारसंघ ( अनुसूचित जाती ) अंतर्गत जळकोट तालुक्यातील अतनूर परिसरातील रावणकोळा, हळदवाढवणा येथे मतदार जनजागृती ( स्वीप ) अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत येथे मतदार जागृतीचा करण्यात आली. तलाठी सुरज भिसे यांच्या नियोजनाखाली गावातील मतदारांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे यांच्या कल्पक दृष्टिकोनातून उदगीर विधानसभा मतदारसंघातील हा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येत आहे. तहसीलदार सौ.सुरेखा स्वामी यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील सर्व गावातील नागरिकांना आपला मतदानाचा अधिकार मतदानाच्या वेळी वापरण्यासाठी प्रेरित करण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून अतनूर परिसरातील रावणकोळा, हळदवाढवणा येथे तलाठी सुरज भिसे यांच्या पुढाकाराने मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आले. गावात मतदान करण्याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थी रॅली काढून गावात मतदानाबद्दल वातावरण निर्मिती करण्यात आली. येथे गटचर्चाही घडविण्यात आली. मतदानास अधिक अधिक प्रतिसाद मिळावा हा उद्देश सफल व्हावा यासाठी तहसीलदार सौ.सुरेखा स्वामी, नायब तहसीलदार संतोष गुट्टे, नायब तहसीलदार जी.एल.खरात, मंडळ अधिकारी कमलाकर पन्हाळे, राजेंद्र कांबळे, लिपीक रऊफ शेख, डाटा ऑपरेटर अलीम शारवाले, सर्व बीएलओ, व तलाठी सह ग्राहक संरक्षण परिषदेचे शासन नियुक्त अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर तसेच जनक्रांती डोंगरी विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अतनूर, साधुराम ग्रामीण विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अतनूर, वसुंधरा महिला मंडळ, जिजामाता महिला मंडळ अतनूर हेही परिश्रम घेत आहेत. तसेच त्यांना विविध सेवाभावी संस्थेचे सहकार्य मिळत आहे.

# राष्ट्रीय विद्युत सुरक्षा दिन व लाईनमन दिवस विविध उपक्रमांनी साजरा

अतनूर / प्रतिनिधी - देशभरातील लाईनमनबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केंद्र शासनाने ४ मार्च २०२३ रोजी देशभरात लाईनमन दिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. ४ मार्च रोजी महावितरणमध्ये सर्वत्र लाईनमन दिवस साजरा करण्यात येतो असून त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे लातूर परिमंडळात आयोजन करण्यात आले आहे.

जनमित्र म्हणजेच लाईनमन हा महावितरणच्या व्यवस्थेमधील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. महावितरणचे जनमित्र ऊन, वारा, पाऊस तसेच इतरही अत्यंत खडतर परिस्थितीत ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठ्यासाठी ते चोवीस तास सेवा देतात. त्यांच्या या कामाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या दिवसाचे आयोजन करण्यात आले आहे. यात महावितरणच्या राज्यभरातील प्रादेशिक व परिमंडळ स्तरावर आयोजित मुख्य कार्यक्रमांमध्ये नियमित व बाह्यस्त्रोत महिला व पुरुष लाईनमनचा प्रादेशिक संचालक व मुख्य अभियंता यांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे. याशिवाय ग्रामीण भागात विभाग कार्यालयाचे कार्यक्षेत्र विस्तारलेले व दुर्गम आहे अशा विभागांतील उपविभाग कार्यालय किंवा अतिदुर्गम शाखा कार्यालयांमध्ये दिवंगत ग्राहकतीर्थ बिंदुमाधव जोशी यांच्या ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्याचे लातूर जिल्हासंघटक तथा ग्राहक संरक्षण परिषदेचे शासन नियुक्त अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, पोलीस दक्षता समिती महाराष्ट्र राज्याचे मराठवाडा अध्यक्ष बी.जी.शिंदे अतनूरकर, युवा ग्रामीण पत्रकार संघ, जनक्रांती डोंगरी विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अतनूरचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष एस.बी.जी.शिंदे, विद्युत मित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे यांच्याकडून स्वतंत्रपणे लाईनमन दिवसाचे आयोजन करण्यात आले. यावेळी राम गुंडाप्पा बिरादार कनिष्ठ अभियंता महावितरण तसेच उपकार्यकारी अभियंता वाघमारे सर यांच्यासह १३ लाईनमन संतोष शिंदे, चंद्रकांत ओमप्रकाश पांचाळ, डी.आर.भूषणवाड, एम.एम. राऊतवाड, एकनाथ सगर, आचार्य सुधीर, अमित अत्रे, बालाजी केंद्रे, महेश मुळे, संदीप बिरादार, विशाल सूर्यवंशी, आकाश तेलंग, माधव पाटील सी.ओ.पांचाळ यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यानिमित्त अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर म्हणाले की, विद्युत सुरक्षा नियमांचे पालन करण्याचे तसेच ग्राहकांनी वीजबिल भरून सहकार्य करण्याचे आव्हान यादरम्यान सर्व ग्राहक जनतेला करण्यात आले.






# बूथ प्रतिनिधींनी पक्षाची विचारधारा लोकांपर्यंत पोहचवून पक्ष संघटन वाढवावे – पाटील

धाराशिव दि.४ (प्रतिनिधी) – काँग्रेस पक्षाच्या बैठकीला उपस्थित कार्यकर्त्यांची वाढलेली संख्या पाहून पक्षावर कोणताही परिणाम झालेला नसल्याचे हे आज दिसून येत आहे. कोणताही नेता पक्ष सोडून गेला तरी कार्यकर्ता पक्ष सोडून जात नाही, हे प्रत्येक निष्ठावंत कार्यकर्त्याने लक्षात ठेवून आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर बूथ कमिट्या मजबूत कराव्यात. पक्षाच्या बूथ प्रतिनिधींनी पक्षाची विचारधारा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवून पक्ष संघटन वाढवावे, असे आवाहन काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष ॲड.धीरज पाटील यांनी दि. ४ मार्च रोजी केले.

धाराशिव येथे जिल्हा काँग्रेस कमिटीची बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष विश्र्वास शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष डॉ.स्मिता शहापूरकर, उपाध्यक्ष खलील सय्यद, अभिजीत चव्हाण, विजयकुमार सोनवणे, महेश देशमुख, अषिलेश मोरे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ॲड. पाटील म्हणाले की, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर काही जणांनी पक्षांतर केल्यामुळे जिल्हा काँग्रेसच्या संघटनावर परिणाम होईल अशी चर्चा होत होती. परंतू या बैठकीला उमरगा आणि लोहारा तालुक्यातील उपस्थित कार्यकर्त्यांच्या संख्येमुळे काँग्रेस पक्षावर कोणताही परिणाम होणार नाही हे स्पष्ट झाले आहे. कोणी पक्ष सोडू गेले म्हणून कार्यकर्त्यांनी संभ्रमात पडू नये. राज्याचे माजी परिवहन मंत्री मधुकरराव चव्हाण आणि आपण स्वतः सर्वसामान्य कार्यकर्त्यांसोबत आहोत. लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या पूर्वीच बूथ कमिटी सदस्यांनी पक्ष संघटन अधिक मजबूत करावे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष विश्र्वास शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष डॉ.स्मिता शहापूरकर, उपाध्यक्ष खलील सय्यद, अभिजीत चव्हाण, विजयकुमार सोनवणे, महेश देशमुख, अषिलेश मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन जिल्हा संघटक राजाभाऊ शेरखाने यांनी तर आभार बाजार समितीचे संचालक उमेश राजे यांनी मानले. या बैठकीस जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पाटील, सेवा दलाचे विलास शाळू, प्रदेश सचिव अभिजीत चव्हाण, शंकरराव करंजकर, युवक प्रदेश सचिव महेश देशमुख तालुकाध्यक्ष पांडूरंग कुंभार, ॲड. हनमंत वाघमोडे, रोहित पडवळ, राजेश शिंदे शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, रमेश परदेशी, रवि ओझा, नवाज काझी, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक महेबुब पटेल, विजयकुमार सोनवणे, नाना भोसले, प्रदेश सचिव शीला उंबरे, जिल्हा सरचिटणीस आश्र्लेष मोरे, सिध्दार्थ बनसोडे, अशोक बनसोडे, विनोद वीर, अमर माने, अशोक भातलवंडे, भूषण देशमुख, अशोक शेळके, वसंत मडके, विद्यार्थी काँग्रेसचे अध्यक्ष कफील सय्यद, धनंजय राऊत, अल्पसंख्यांक अध्यक्ष अय्युब पठाण, प्रेमानंद सपकाळ, अहमद चाऊस, शशिकांत निरफळ, अनिलकुमार लबडे, विलास करंजकर, अब्दुल लतीफ, विश्र्वंभर मैंदाड, विकास तांबे, स्नेहप्रभा पाटील, संजय गजधने, सौरभ गायकवाड, रविंद्र डोंगरे, संजय पवार, कृष्णा तवले, सलमान शेख, बालाजी माने, धवलसिंह लावंड, दिलीप क्षीरसागर, बाळासाहेब पाटील, ज्ञानेश्र्वर जगताप, महादेव आरबळे, सचिन गायकवाड, शहजान शिखलकर, अवधुत क्षीरसागर, अमर तागडे, अमित रेड्डी, अजय खरसडे, मेहराज शेख, रामलिंग नंदगावकर, सिराज मोगल, संजय देशमुख, पंडित सुरवसे, अमोल चव्हाण, आबासाहेब रोडे, हनमंत पाटील, शामराव भोसले, भारत काटे, सुनिल गायकवाड, प्रफुल्ल गायकवाड, महेश जाधव, संतोष चौधरी यांच्यासह जिल्हाभरातील काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेषतः उमरगा-लोहारा तालुक्यातील कार्यकर्त्यांची संख्या लक्षणीय होती.





उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो




उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!

अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)

डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेंद्रे सचिव

# राष्ट्र उभारणीचा आधार म्हणजे युवक: ॲड.प्रवीण पाटील

लातूर / प्रतिनिधी– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड व दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविदयालय लातूर चा राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विदयामाने दि २६ फेब्रुवारी ते १ मार्च या दरम्यान लातूर जिल्हास्तरीय युवक–युवती नेतृत्व विकास शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराच्या अध्यक्षस्थानी प्रा.विशाल वर्मा तर प्रमुख मार्गदर्शक ॲड.प्रवीण पाटील सदस्य,राष्ट्रिय सेवा योजना सल्लागार समिती, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांचे सामाजिक उपक्रमामध्ये युवकांची भुमिका या विषयावर मार्गदर्शन आयोजित केले होते.

यावेळी प्रमुख पाहुणे प्रा.लता जाधव,प्रा.योगेश शर्मा,प्रा.अजय चव्हाण उपस्थित होते. या शिबीराची प्रस्तावना प्रा.योगेश शर्मा यांनी केली. यावेळी



प्रमुख मार्गदर्शक ॲड.प्रवीण पाटील यांनी युवकांना सामाजिक उपक्रमांची विविध अंगाने माहिती देवुन त्यांची समाजाविषयी असलेली प्रगतीशील भुमिका विशद केली.स्वत: अध्यक्ष असलेल्या आधार फाऊंडेशन च्या माध्यमातुन समाजासाठी राबविलेल्या आम्ही साक्षर आमचा गाव साक्षर या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे अनुभव,मोफत नेत्रतपासणी व शस्त्रक्रिया शिबीराच्यां माध्यमातुन वृध्दांना मिळा–लेली दृष्टी , लढा करोनाशीहा उपक्रम राबविताना समाजाचा घेतलेला सहभाग व कोरोनाच्या काळात समाजाला केलेली मदत व त्या मदतीतुन अनेक नागरिकांचे वाचलेले जीव याचीं माहिती दिली याच बरोबर निक्षय मित्रऊपक्रमांतर्गत क्षय रोग मुक्तीकरिता पुरक पोषण आहार पुरवठा , पर्यावरण विषयक कार्यात निळकंठ ता जि लातूर येथे बेल वृक्ष उद्यान उभारण्याचे अनुभव कथीत केले व बेल वृक्षा मुळे पर्यावरणाचे कश्या प्रकारे संवर्धन होते याची माहिती दिली.

तसेच रेणा सहकारी साखर कारखाना अंतर्गत सहकारमहर्षी दिलीपरावजी देशमुख स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व ग्रंथालय हि मोफत सुविधा विदयार्थ्यान साठी असल्याची माहिती दिली. या शिबीरास लातूर जिल्ह्यातील प्रत्येक महाविदयालयाचे दोन विदयार्थी उपस्थित होते. या शिबीरास विदयार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन निकीता काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन गौरी मामडगी यांनी केले.

# आ. अभिमन्यू पवार यांना दुबईत नवभारत ॲचिव्हर्स ॲवॉर्ड

## शेतरस्त्यांच्या औसा पॅटर्न बद्दल होणार सन्मान

लातूर : शेतरस्ता, पाणी आणि वीज या शेतीच्या तीन मूलभूत गरजा असून, ग्रामीण भागातील बहुतांश शेतरस्ते सहसा अतिक्रमणाने ग्रस्त आणि भांडणतंट्याचे केंद्र बनले आहेत. कायम दुर्लक्षित राहिलेल्या शेतरस्त्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे आस्थापूर्व विशेष लक्ष देवून शेत तिथे रस्ता अभियान हाती घेत या विषयात संपूर्ण राज्यात ङ्गऔसा पॅटर्नफ निर्माण केल्याच्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल औशाचे आमदार अभिमन्यू पवार यांना ङ्गनवभारत इंटरनॅशनल ॲवॉर्ड अंतर्गत नवभारत ॲचिव्हर्स ॲवॉर्ड घोषित झाले आहे. येत्या ९ मार्च रोजी दुबईमध्ये तेथील राजघराण्यातील मान्यवरांच्या हस्ते हा सन्मान आ. पवार यांना समारंभपूर्वक प्रदान करण्यात येईल.

दुबईतील हॉटेल हयात रिजेन्सी या पंचतारांकित हॉटेलच्या भव्य सभागृहात ९ मार्च रोजी सायंकाळी हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार असून, हा सन्मान स्वीकारण्यासाठी आ. पवार शुक्रवारी मुंबईहून सप–त्निक दुबईला रवाना होत आहेत. आ. अभिमन्यू पवार यांनी केवळ दोन वर्षांतच आपल्या औसा मतदारसंघात १३०० किमी. पेक्षा अधिक लांबीचे शेतरस्ते अतिक्रमणमुक्त करून शेतकरी बांधवांच्या अडचणी दूर केल्या आहेत. शिवाय शासकीय योजनांमधून शेतकऱ्यांना कृषिपूरक सुविधा उभारून देण्याचा संकल्प करून त्यांनी मनरेगातून ग्रामसमृद्धीचाही औसा पॅटर्न करून दाखविला आहे. मतदारसंघातील शेकडो शेतकऱ्यांना फळबागा, जनावरांसाठी गोठा, सेंद्रीय खतनिर्मिती प्रकल्प, सिंचन विहिरी, शेततळे आदी घटकांचा लाभ मिळवून दिला असून, आ. पवार यांच्या या अभियानामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे. आ. अभिमन्यू पवार २०१९ पासून औसा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत असून, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यापूर्वी त्यांना मुख्यमंत्री कार्यालयात स्वीय सहाय्यकाची जबाबदारी दिली होती. ती समर्थपणे सांभाळून आ. पवार यांनी लोकाभिमुख प्रशासन कसे असते याची चुणूक दाखवून दिली. गेल्या दीड दशकांपासून बंद पडलेला आणि एकेकाळी शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेला किल्लारी येथील शेतकरी सहकारी साखर कारखाना त्यांनी पुनरूज्जीवित केला असून औसा, निलंगा, उमरगा आणि लोहारा या भूकंपग्रस्त तालुक्यांमध्ये जवळपास २५ हजार उसउत्पादक शेतकऱ्यांना आणि जवळपास ५ हजार कर्मचाऱ्यांना आर्थिक दिलासा दिला आहे. त्यांनी उसाला उच्चांकी २६५० रुपये प्रतिटन भाव देवून परिसरातील शेतकऱ्यांना पुन्हा एकदा आनंदाचे दिवस बहाल केले आहेत. शिवाय सामुहिक विवाह सोहळा, म. फुले जनआरोग्य योजना, राजमाता जिजाऊ– शाळा माझी न्यारी, मतदारसंघातील शाळांमध्ये अद्ययावत कॉम्प्युटर लॅब, क्रीडा केंद्रे, वॉटर फिल्टर प्लँट, सोलार सिस्टीम, ओपन जीम आदी क्षेत्रांतही आ. पवार यांनी आगळीवेगळी लक्षणीय कामगिरी केली आहे. रा.स्व. संघाचे संस्कार असलेल्या आ. अभिमन्यू पवार यांनी आपले पिताश्री ह.भ.प. दत्तात्रय पवार यांच्या पावलावर पाऊल ठेवून समाजसेवेचे आणि हिंदुत्वाचे बाळकडू घेतले आहे.

# मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानात श्रीपतराव भोसले हायस्कूल जिल्ह्यात प्रथम

धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानामध्ये खासगी व्यवस्थापन गटामधून श्रीपतराव भोसले हायस्कूलने जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त आहे.

याबद्दल श्रीपतराव भोसले हायस्कूलचे प्राचार्य साहेबराव देशमुख यांचा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. हे अभियान शासकीय व खासगी व्यवस्थापनातील सर्वच माध्यमांच्या शाळेसाठी आयोजित करण्यात आले होते. श्रीपतराव भोसले हायस्कूलने जिल्ह्यात खा–सगी व्यवस्थापन गटात प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याबद्दल ११ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. यावेळी उपमुख्याध्यापक एस.बी. कोळी, उपप्राचार्य संतोष घार्गे, पर्यवेक्षक के. वाय. गायकवाड, धनंजय देशमुख, निखीलकुमार गोरे, प्रा. नंदकुमार नन्नवरे आदी उपस्थित होते.



# शिरूरआनंतपाळ तालुक्यात दुष्काळची दाहकता; फळबागा करपल्या, विहीरी आटल्या



**प्रशांत तांबोळकर**

शिरूरआनंतपाळ : प्रशांत तांबोळकर / तालुक्यात दुष्काळाची दाहकता वाढली असुन येरोळ व परिसरात अत्यअल्प पाऊस पडल्याने विहीरी व बोअरची पाणी पा–तळी खालावली आहे. तर काही विहीर व बोअर बंद पडले आहेत. येरोळ साकोळ रोडलगत असलेल्या येरोळ येथील एका शेतकर्याची सिताफळ व पेरुची बाग पाण्यावाचून करपुन गेली आहे.

येरोळ येथील शेतकरी नारायण नरसिंग दामले यांनी मोठ्या कष्टाने सिताफळाची बाग फुलवली होती. त्यांनी एक हेक्टरमध्ये एनएमके गोल्डन सिताफळाची ४८५ झाडे व थाइ सेवन पेरुची सातशे रोपाची दोन वर्षापुर्वी लागवड केली आहे. माञ निसर्गाने हुलकाहुनी दिल्याने त्यांच्या विहीरीतील पाणीसाठा जानेवारीमध्येच आटला. त्यामुळे शेतकरी दामले यांनी पाणाड्याच्या सल्याने पाचशे फुट खोल दोन बोअर घेवून लाखो रुपये खर्च करुणही पाणी लागले नाही. बाग जगविण्यासाठी दोन हजार रुपये एक टॅकर करुन थेंब थेंब पाणी देऊन बाग जगविण्याचा प्रर्यत्न केला पण शेजारील व परिसरातील अनेकांच्या विहीरीची व बोअरची पाणी पातळी खालावली असुन आठ तास चालणार्या मोटारी एक तासावर आल्या आहेत. तर बोअर शेवटची घटका मोजत आहेत.

विकतही पाणी मिळत नसल्याने त्यांची हि बाग पाण्यावाचून करपुन जात आहे. या शेतकर्याने आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर मेहनत करून हि सिताफळ व पेरूच्या बागेची उभारणी केली होती . नारायण नरसिंग दामले यांनी या सिताफळाच्या बागेत आंतरपिक म्हणुन कांद्याचे उत्पादन घेत असतात. हि बाग पावसाळ्यात येरोळ साकोळ या रस्त्याने जाताना हिरव–ीगार झाडे दिसायची माञ दुष्काळी परिस्थितीचा फटका बसल्याने शेतकरी हवालिदल झाला आहे. पाच ते सहा वर्षात पावसाळ्याचे प्रमाण हे कमी कमी झाले, उपलब्ध पाण्यावर आतापर्यंत बाग मोठी केली होती, पण शेवटी यावर्षी पिण्यासाठी पाणी मिळत नाही व बागेसाठी पाणी आणणे हे अवघड झाले आहे. डोळ्यादेखत पाण्याअभावी बाग वाळून जात असल्याने शेतकर्याच्या डोळ्यातुन अश्रु येत आहेत.

## पाण्याचा वापर काटकसरीने करावा

येरोळ सह जांभळवाडी, पांढरवाडी व हानमंतवाडी या चार गावाला पाणी पुरवठा करणार्या पांढरवाडी तलावातील पाणी ज्योत्याखाली गेले आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा काटकसरतीने वापर करून ग्रा.प.ला सहकार्य करावे असे आवाहान उपसरपंच सतिस सिंदाळकर यांनी केले आहे

## दुग्ध व्यावसायावर परिनाम

येरोळ व परिसरात अनेक शेतकरी जोडधंदा म्हणुन दुभती जनावरे ठेवतात. येरोळ मध्ये दुभती बाराशे जनावरे आहेत. यावर्षी पावसाअभावी विहीर व बोअरचे पाणी आटले आहे. चारा व पाणी टंचाईमुळे दुध संकलनात घट झालेली आहे. माझ्याकडे सात दुभती जनावरे आहेत. विहीरीचे पाणी जानेवारीतच आटले आहे. त्यामुळे जनावरे विकायची पाळी आली असल्याचे शेतकरी गूंडेराव चौसष्टे यांनी सांगितले.




# संपादकीय

## भाजप सज्ज

वादग्रस्त विधाने करणाऱ्यांना उमेदवारी देणे जोखमीचे ठरेल हे लक्षात घेऊन तो धोका टाळण्याचा निर्णय भाजपने घेतलेला दिसतो. प्रज्ञासिंह ठाकूर, रमेश बिधुरी, परवेश वर्मा यांना बेताल विधाने भोवली.

लोकसभा निवडणुकीसाठी १९५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करून भाजपने आघाडी घेतली. जागावाटपावरून इंडिया आघाडीतील काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि आम आदमी पक्ष यांच्यात समझोता झाला; पण उमेदवारांची घोषणा बाकी आहे. अलीकडच्या काळात पाच राज्यांमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने धक्कातंत्राचा वापर केला. लोकसभेच्या अनेक सदस्यांना निवडणूक रिंगणात उतरविण्यात आले. आता त्याच धक्कातंत्राचा वापर केला जाईल, असा अंदाज व्यक्त केला जात होता, मात्र पहिल्या यादीत तरी विद्यमान लोकप्रतिनिधींचीच संख्या अधिक दिसते. सर्व जागांवरील उमेदवारांची घोषणा झाल्यावरच पक्षाची व्यूहरचना अधिक स्पष्ट होऊ शकेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा वाराणसी मतदारसंघातून निवडणूक लढविणार आहेत. वाराणसीतील विकास प्रकल्प, तेथे होणाऱ्या पंतप्रधानांच्या कार्यक्रमांची संख्या हे पाहता ते मतदारसंघ बदलतील, अशी शक्यता नव्हतीच! पण मतदारसंघावरून वावड्या बऱ्याच उठविल्या गेल्या. केंद्रीय गृह मंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह अनुक्रमे गांधीनगर आणि लखनौ या आपल्या हक्काच्या मतदारसंघातून निवडणूक लढविणार आहेत. दिल्लीतील विद्यमान चार खासदारांच्या जागी पक्षाने अन्य उमेदवारांना तिकीट दिले आहे. मीनाक्षी लेखी, डॉ. हर्षवर्धन ही त्यातील ठळक नावे. पक्षांतर्गत राजकारणात अडवानींच्या कट्टर समर्थक मानल्या जाणाऱ्या सुषमा स्वराज यांच्या कन्येला नवी दिल्ली मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. भोपाळच्या खासदार प्रज्ञासिंह ठाकूर यांना उमेदवारी नाकारण्यात आली. उत्तर प्रदेशातील ८० पैकी ५१ जागांसाठी भाजपने उमेदवार जाहीर केले.


**विद्यमान खासदारांवर विश्वास**

उत्तर प्रदेशात विद्यमान खासदारांवरील विश्वास पक्षाने कायम ठेवला. पक्षाची मदार हिंदी भाषक पट्ट्यावर असून, उत्तर प्रदेशात आताची समीकरणे बिघडणार नाहीत याचीच पक्षाने काळजी घेतलेली दिसत आहे. १९५ जणांच्या यादीत डॉ. अब्दुल सलाम हे एकमेव मुस्लीम धर्मीय उमेदवार असून, त्यांना केरळमधील मल्लपूरम मतदारसंघातून रिंगणात उतरविण्यात आले आहे. मध्य प्रदेशात भाजपची सत्ता कायम राखण्यात शिवराजसिंह चौहान यांची भूमिका महत्त्वाची होती, पण, त्यांच्याऐवजी मोहन यादव यांच्याकडे राज्याची सूत्रे देण्यात आली. आता विदिशा लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देऊन येत्या काळात शिवराज यांना योग्य स्थान दिले जाईल, हा संदेश पक्षाने दिला आहे. त्यांच्यासह आसामचे माजी मुख्यमंत्री सर्वानंद सोनोवाल आणि त्रिपुराचे माजी मुख्यमंत्री विप्लवकुमार देव यांनाही भाजपने लोकसभेच्या मैदानात उतरविले आहे. भाजपने काही राज्यांमध्ये अन्य पक्षांबरोबर आघाडी केली आहे. महाराष्ट्र, बिहार, पंजाब, आंध्र प्रदेश यासारख्या राज्यांमधील उमेदवार अद्याप निश्चित व्हायचे आहेत. तेथेच भाजपची कसोटी लागेल. उत्तर प्रदेश खालोखाल लोकसभेच्या सर्वाधिक जागा महाराष्ट्रात असून, अर्थातच जागावाटपात अधिकाधिक जागा पदरात पाडून घेण्याचा भाजपचा प्रयत्न राहील. महाराष्ट्र भाजपसाठी किती महत्त्वाचा ठरला आहे हे पंतप्रधानांसह पक्षाच्या केंद्रीय पातळीवरील नेत्यांच्या सातत्याने होणाऱ्या दौऱ्यांमधून दिसते. पहिल्या यादीत महाराष्ट्रातील एकही उमेदवार नसणे, हेच येथील चित्र किती आव्हानात्मक आहे ते सांगून जाते. काँग्रेसमध्ये अनेक दशके काढल्यावर जे पक्ष सोडून आले त्यांना संधी देण्याचा भाजपचा प्रयत्न दिसतो. मुंबईचे कृपाशंकरसिंह यांना भाजपने उत्तर प्रदेशातील जौनपूरमधून रिंगणात उतरविले. ही जागा मागील वेळी बहुजन समाज पक्षाच्या श्यामसिंह यादव यांनी जिंकली होती. पन्नाशीच्या आतील ४७ उमेदवारांचा समावेश, हे भाजपच्या पहिल्या उमेदवारी यादीचे वैशिष्ट्य मानता येईल. विकसित भारताच्या निर्मितीसाठी देशातील १४० कोटी जनता आपल्याला आशीर्वाद देईल, याचा पंतप्रधान मोदी यांच्याकडून वारंवार उच्चार होतो. निवडणुकीसाठी भाजपच्या सज्जतेचा वेग पाहून विरोधकांनी गती वाढवली तरच आव्हान देता येईल.

**ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया आपेक्षित आहे.**

– संपादक **यशवंत** लातूर

## हिपॉक्रेटिस ४०



वैद्यकशास्त्राच्या नभांगणात चमकणारा पहिला ग्रीक तारा हिपॉक्रेटिस याचा जन्म कॉस या बेटावर इ. स. पूर्व ४६० मध्ये झाला. लहानपणापासूनच तो बुद्धिमान होता आणि गणित, ज्योतिष, राज्यशास्त्र व नाट्य वगैरे विषयात तो प्रवीण होता. तत्कालीन सुप्रसिद्ध वैद्यकशास्त्रज्ञ हिरॉडिकस याच्याकडे तो वैद्यकाच्या अभ्यासासाठी गेला आणि विविध देशोदेशीच्या प्रवासातही हिपॉक्रेटिसने अनेक विद्यांचा व विविध ज्ञानाचा संग्रह केला.

त्याकाळी ग्रीस देशामध्ये देवाच्या कोपामुळे रोगराई, आजार होतात असे समजले जाई. नवस, स्वप्ने, दृष्टांत याद्वारे रोगनिवारणाचे मार्ग अवलंबले जात असत. अंधश्रद्धेमुळे रोगावरील उपाय नेमकेपणाने कोणी शोधत नसत. अशा मांत्रिक, भूतांच्या मतप्रवाहांविरुद्ध हिपॉक्रेटिस बंड करून उठला. रोगनिवारणासाठी योग्य उपचार व आरोग्य वर्धक वातावरण यांचे महत्त्व हिपॉक्रेटिसने गावकऱ्यांना, लोकांना पटवून दिले. दैवी प्रयत्नाऐवजी रोग परीक्षा, रोग निरीक्षण व औषधोपचार यांचे महत्त्व सर्वांच्या लक्षात आणून दिले. युरोपच्या इतिहासात मानवी उपायानेच रोगनिवारणाचा मार्ग सापडतो, असे ठामपणे सांगणारा पहिला वैद्यकशास्त्रज्ञ

म्हणजे हिपॉक्रेटिस होय. काही ग्रीक नागरिकांचा मात्र त्याला विरोध असे. देव किंवा दैवाविरुद्ध बोललेले त्यांना आवडत नसे. अशाने देवाचा कोप होऊन साथी फैलावतील असे त्यांना वाटे पण या जनसामान्यांच्या विरोधाला हिपॉक्रेटिसने न जुमानता कर्तव्य चालू ठेवून वैद्यकीय ज्ञानास शास्त्रीय स्वरूप दिले. त्या काळच्या वैद्यांपेक्षा हिपॉक्रेटिसला शरीरशास्त्राचे बरेच ज्ञान होते. शरीरातील हाडे, प्रत्येक हाडाचे स्थान व परस्पर संबंध याचे थोडेफार ज्ञान त्याला होते. रोगी कसे तपासावेत, रोगपरीक्षा कशी व्हावी, वैद्याचे वर्तन कसे असावे याविषयी उत्कृष्ट मार्गदर्शन हिपॉक्रेटिसने करून ठेवले आहे.

रोग्याशी कसे वागावे, स्वच्छता कशी राखावी, हत्यारे कशी वापरावीत, रोग्याचा बिछाना कसा असावा, जखमा कशा बांधाव्यात याविषयीची सविस्तर माहिती त्याने लिहून ठेवली आहे. वैद्यक म्हणजे डॉक्टरकी करताना डॉक्टरांना जी प्रतिज्ञा घ्यावी लागते तिची मूळ बैठक हिपॉक्रेटिसनेच तयार करून ठेवली आहे. डॉक्टरांच्या आचारसंहितेवर त्याने स्वच्छ प्रकाश टाकला आहे. डॉक्टरांच्या हातात जिव्हाळा असेल तर त्याने रुग्ण अर्धा बरा होईल आणि अर्धा अचूक औषधाने बरा होईल. 'मी माझ्या पेशाशी व रुग्णाशी एकनिष्ठ राहीन.' अशी शपथ घेऊन डॉक्टरांनी या पेशात प्रवेश करावा असे त्यांचे सांगणे होते.

हिपॉक्रेटिस नीतीशास्त्राचाही भोक्ता होता. डॉक्टरांनी नीतिमान असावे हे सांगताना तो म्हणतो रोग्याच्या खोलीत प्रसन्न चित्ताने प्रवेश करावा, रोग्यांस संबंधितास दिलासा वाटेल असे बोलावे, पोशाख नीटनेटका, सौम्य असावा, पैशासाठी रोग्यास न अडविता उपचार करावेत, आधी माणसावर प्रेम करा मग धंद्यावर ! आपल्या व्यवसायाची कला ज्या माणसांसाठी आहे. त्यावर प्रेम करण्याने ती समृद्धच होईल अशी लाखमोलाची शिकवण देऊन व रुग्णसेवेत आयुष्य वेचणाऱ्या या महान शास्त्रज्ञाचा अंत इसवी सन पूर्व ३७० मध्ये झाला.

## मशरूमचे हे फायदे वाचून तुम्ही लगेचच खाण्यास कराल सुरूवात

मुंबई: काही जणांना मशरूम(ाीहीा) खायला आवडत नाही. तुमचेही उत्तर जर हा असे आहे तर याचे एकदा फायदे जाणून घ्या थंडीच्या दिवसांत अनेक आजार आपल्या अवतीभवती असतात. अशातच आपले डाएट योग्य ठेवणे गरजेचे असते. या बदलत्या वातावरणाशी लढण्यासाठी आपण निरोगी असणे गरजेचे असते. अशातच मशरूम ही अशी गोष्ट आहे जी तुमच्या शरीराला अनेक फायदे मिळवून देते. मशरूम आपल्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहेत. हे तुम्ही सॅलड, सँडविच, पिझ्झा, मिक्स व्हेज, मंच्युरियन म्हणून खाऊ शकता.

व्हिटामिन डी मोठ्या प्रमाणात व्यस्त वेळापत्रकामुळे अनेकांना उन्हात बसायला वेळ मिळत नाही. त्यामुळे व्हिटामिन डीची कमतरता होते. अशातच तुम्ही व्हिटामिन डीची कमतरता भरून काढण्यासाठी मशरूमचे सेवन करू शकता.

पोषकतत्वांनी भरपूर मशरूममध्ये व्हिटामिन डी, बी, सेलेनियम, पोटॅशियम आणि कॉपर मोठ्या प्रमाणात असते. हे व्हिटामिन्स शरीराल विविध आजारांशी लढण्यास मदत करतात. सोबतच आरोग्य चांगले राखतात.

इम्युनिटी वाढते मशरूममध्ये बायोॲक्टिव्ह कंपाऊंड मोठ्या प्रमाणात असतात जे इम्युनिटी वाढवण्यास मदत करतात. यात बीटा ग्लुकेन नावाचे तत्व असते जे थंडीत येणाऱ्या सर्दी तापासासाठी तसेच इन्फेक्शनविरोधात लढण्यास मदत करते.

अँटीऑक्सिडंटचा खजाना मशरूम्समध्ये मोठ्या प्रमाणात अँटी ऑक्सिडंट्स असतात जे सेल्युलार हेल्थ मजबूत करतात आणि स्ट्रेस रिलीज करतात.

वेट लॉसमध्ये फायदेशीर वजन घटवण्यासाठी जे लोक दिवसरात्र मेहनत करत आहेत त्यांनी आपल्या डाएटमध्ये मशरूम्सचा समावेश करावा. यातील फायबर्स फॅट कमी करण्यास मदत करतात.



## दात पिवळे होण्याची चिंता आहे ? फक्त हे ३ घटक मिसळा आणि आठवड्यातून ३ वेळा लावा

दात पिवळे होतात आणि टार्टर तयार होतात, ज्यामुळे त्यांचा रंग बदलतो. अशा वेळी हा घरगुती उपाय तुम्हाला दात स्वच्छ करण्यास मदत करेल. इतकंच नाही तर ज्या दातांमध्ये कृमी आहेत किंवा झपाट्याने खराब होत आहेत अशा दातांसाठी ही रेसिपी खूप लवकर काम करते. दातदुखी कमी करण्यासाठी ही पद्धत अनेकदा प्रभावी ठरते. तर, प्रथम ते काय आहे ते जाणून घेऊया आणि नंतर आपण त्याचे विविध फायदे जाणून घेऊ.

दातांसाठी मोहरीचे तेल आणि मीठ कसे वापरावे : आपले दात नेहमी स्वच्छ आणि चांगले दिसावेत अशी प्रत्येकाची इच्छा असते. दात पांढरे करण्यासाठी सोपे घरगुती उपाय फायदेशीर ठरू शकतात. डेंटल क्लिनिकचा खर्चही वाचेल आणि दात स्वच्छ दिसतील. टूथपेस्ट सतत बदलण्यापेक्षा, पिवळे दात दूर करण्यासाठी काही घरगुती उपाय केल्यास चांगले परिणाम दिसून येतात.तुम्हाला फक्त मीठ, सोयाबीन तेल आणि लिंबाचा रस घालायचा आहे. आता हे तिन्ही मिक्स करून दात स्वच्छ करा.

आपल्याला आठवड्यातून ३ वेळा हे करणे आवश्यक आहे. तुम्हाला तीन आठवड्यांत परिणाम दिसून येतील. याचा तुमच्या दातांवर दीर्घकाळ परिणाम होईल.

दातांसाठी मीठ आणि सोयाबीन तेल

अँटी-बॅक्टेरियल : मीठ, सोयाबीन तेल आणि लिंबू हे सर्व बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारे आहेत आणि दात किडण्यास प्रतिबंध करतात. ते तुमचे दात आतून स्वच्छ करतात आणि नंतर दात निरोगी ठेवण्यास मदत करतात.

विरोधी दाहक गुणधर्म समृद्ध : मीठ, सोयाबीन तेल आणि लिंबू हे सर्व दाहक-विरोधी गुणधर्मांनी समृद्ध आहेत आणि दात सूज आणि किडणे कमी करतात. ते दाण्यांमध्ये खोलवर जाऊन वेदना कमी करतात आणि मज्जातंतूंना आराम देतात. अशा प्रकारे, त्याचे दाहक-विरोधी गुणधर्म दात किडणे टाळण्यास मदत करतात.

अम्लीय गुणधर्माने समृद्ध : मीठ, सोयाबीन तेल आणि लिंबू हे सर्व आम्लयुक्त असतात. तिन्ही मिळून दातांमध्ये पिवळे आणि टार्टर जमा होणे कमी करतात आणि दात स्वच्छ होण्यास मदत करतात.

## जगातील या ६ ठिकाणी कधीच होत नाही सुर्यास्त, रात्रीही असते दिवसासारखा प्रकाश

दिवसात २४ तास असतात, त्यापैकी १२ तास आपण सूर्यप्रकाशात घालवतो आणि बाकीचे सूर्यास्तानंतर रात्री घालवतो. जरा विचार करा, हा सूर्य कधीच मावळला नाही तर काय होईल. यामुळे तुमची दिनचर्याच विस्कळीत होणार नाही, तर तुमचे जीवनही विस्कळीत होईल. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की जगात अशी अनेक ठिकाणे आहेत, जिथे सूर्य ७० दिवसांपेक्षा जास्त काळ मावळत नाही. याचा अर्थ येथे कधीच रात्र होत नाही. १२ तासांनंतरही येथे दिवसभराची धांदल कायम असते. पाहिले तर पर्यटकांनी कुठेही प्रवास करण्यासाठी वेळेचा मागोवा ठेवणे अत्यंत आवश्यक आहे, पण हीच ठिकाणे आहेत, जिथे पर्यटकांचा अनेकदा गोंधळ उडतो. चला तर मग जाणून घेऊया पृथ्वीवरील या ६ ठिकाणांविषयी, जिथे सूर्य मावळत नाही.

नॉर्वे – आर्क्टिक सर्कलमध्ये स्थित नॉर्वेला मध्यरात्री सूर्याची भूमी म्हणतात. येथे मे महिन्याच्या अखेरीपासून जुलैपर्यंत ७६ दिवस सूर्य कधीच मावळत नाही. नॉर्वेच्या स्वालबार्डमध्ये १० एप्रिल ते २३ ऑगस्टपर्यंत सूर्य सतत चमकतो. या काळात तुम्ही या ठिकाणी भेट देण्याची योजना करू शकता.

नुनावुत, कॅनडा – नुनावुत हे कॅनडाच्या वायव्य प्रदेशात आर्क्टिक सर्कलच्या सुमारे दोन अंशांवर स्थित आहे. या ठिकाणी जवळपास दोन महिने सतत २४ तास सूर्यप्रकाश मिळतो. तर हिवाळ्यात हे ठिकाण सलग ३० दिवस अंधारात असते.

आइसलँड – आइसलँड हे ग्रेट ब्रिटननंतर युरोपमधील सर्वात मोठे बेट आहे आणि एकही डास नसलेला एकमेव देश आहे. उन्हाळ्यात, आइसलँडमध्ये रात्र असते, तर जून महिन्यात सूर्य कधीच मावळत नाही. मध्यरात्री सूर्याचे प्रताप पाहण्यासाठी, तुम्ही आर्क्टिक सर्कलमधील अकुरेरी आणि ग्रिम्से बेट या शहराला भेट देण्याची योजना आखू शकता.

बॅरो, अलास्का – मे महिन्याच्या अखेरीपासून ते जुलै अखेरपर्यंत येथे सूर्य मावळत नाही. परंतु नोव्हेंबरच्या सुरुवातीपासून पुढील ३० दिवस येथे सूर्य उगवत नाही आणि ती ध्रुवीय रात्र म्हणून ओळखली जाते.

याचा अर्थ हिवाळ्यात संपूर्ण देश अंधारात असतो. बर्फाच्छादित पर्वत आणि मंत्रमुग्ध करणाऱ्या हिमनद्यांसाठी लोकप्रिय, हे ठिकाण उन्हाळ्यात किंवा हिवाळ्यात भेट देता येते.

फिनलंड – फिनलंडला तलाव आणि बेटांचा देश म्हणतात. फिनलंडच्या बहुतांश भागात उन्हाळ्यात फक्त ७३ दिवस सूर्य दिसतो. या दरम्यान सुमारे ७३ दिवस सूर्यप्रकाश पडतो, तर हिवाळ्यात येथे सूर्यप्रकाश दिसत नाही.

इथले लोक उन्हाळ्यात कमी आणि हिवाळ्यात जास्त झोपतात याचे हे देखील एक कारण आहे. फिनलंडला भेट देण्याची ही सर्वोत्तम वेळ आहे. यावेळी तुम्हाला केवळ नॉर्दर्न लाइटसच नव्हे, तर स्कीइंगमध्येही सहभागी होण्याची संधी मिळेल. यावेळी तुम्ही काचेच्या इग्लूमध्ये राहण्याचा अनुभव घेऊ शकता.

स्वीडन – मेच्या सुरुवातीपासून ते ऑगस्टच्या अखेरीस, स्वीडनमध्ये मध्यरात्रीच्या सुमारास सूर्यास्त होतो आणि देशात संध्याकाळी ४ वाजता उगवतो.

येथे सतत ६ महिने ऊन असते. म्हणजे या ६ महिन्यांत येथे सूर्य मावळत नाही. अशा परिस्थितीत, पर्यटक साहसी क्रियाकलाप, गोल्फिंग, मासेमारी, ट्रेकिंग ट्रेल्स आणि बरेच काही करण्यात व्यस्त दिवस घालवू शकतात.

## राशी भविष्य



०७ मार्च २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग: लाल: शुभ दिशा: उत्तर
शुभकामाची रूपरेषा आखाल. राजकीय कामात यश मिळण्याचे योग आहेत. जास्त फायदा मिळण्याच्या दृष्टीने केलेले प्रयत्न फायदेशीर राहतील. दुसऱ्याच्या बोलण्यावर विास दाखवू नका.

वृषभ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व
मागील स्मृती उजाळल्यामुळे दुःख होईळ. धार्मिक प्रवृत्तीत वाढ होईल. उच्च अधिकाऱ्यांच्या भेटी होती. काम चुकारपणा करू नका.

मिथुन : शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण
सामाजिक कामात यश व सन्मान मिळण्याचे योग आहे. परिश्रमाचा पूर्ण मोबदला मिळेल. उत्पन्नात वाढ होईल. खाण्या:पिण्यावर लक्ष असू द्या. रोजगारात प्रगती राहील.

कर्क : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर
मित्रांचे सहकार्य लाभेल. विचारपूर्वक काम केल्याने कामात यश मिळणार आहे. साथीदारांच्या कामावर लक्ष असू द्या. शिक्षणा संबंधीतील कामात यश मिळेल.

सिंह : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
मनमानीने काम करण्याची प्रवृत्तीमुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक स्थिती खराब राहील. कुटुंबातील सदस्यांच्या प्रकृतीची काळजी घ्या.

कन्या : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर
कामकाजात आलेली समस्या आपल्या प्रयत्नामुळे दूर होईल. बाहेरील व्यत्तिंफ्च्या कामकाजावर विशेष लक्ष द्या. यश मिळाल्याने उत्साह वाढेल. व्यापार व्यवसाय फायदेशीर राहील. महत्वकांक्षा पूर्ण होतील.

तुळ : शुभ रंग :निळा, शुभ दिशा: दक्षिण
जुन्या परिचित व्यक्तिची अचानक भेट होईल. मनोबलात वाढ होईल. आर्थिक स्थिती चांगली राहील. कामकाजाची परिस्थिती चांगली राहील. घरासंबंधातील समस्या निर्माण होऊ शकते.

वृश्चिक : शुभ रंग: लाल, शुभ दिशा:दक्षिण
कामात यश मिळाल्याने आनंदी रहाल. प्रवास फायदेशीर असणार आहे. नातेवाईकांशी असलेल्या संबंधावर मर्यादा राखा. कायदेशीर बाबी पूर्ण करा.

धनु : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पूर्व
विशेष काम होण्याचे योग आहेत. साथीदाराचे सहकार्यामुळे मन प्रसन्न राहील. वहान चालवताना सावधानी बाळगा. शारिरीक कामात वाढ करण्याकरिता प्रयत्न करा.

मकर : शुभ रंग: गुलाबी : शुभ दिशा: पूर्व
पूर्वी केलेल्या कामाचा चांगला परिणाम दिसेल. मुलांच्या बाबतीत भावनीक समस्या निर्माण होतील. व्यापारात नवीन योजना आखाल त्या फायदेशीर असतील.

कुंभ : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: पूर्व
कौटुंबिक सदस्याचे आपल्या विषयी मत चांगले राहील. काम करतांना वेळेचे बंधन राखा. आर्थिक गुंतवणूक विचारपूर्वक करा. रागावर नियंत्रण राखणे गरजेच आहे.

मीन : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पूर्व
जोशपूर्वक कामात रस घ्याल. हुशार व्यक्तिची भेट होईल त्यामुळे फायदा होईल. कौटुंबिक समाधान लाभल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपल्या वस्तू संभाळा.

०६ मार्चला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर शुक्र व नेपच्यूनचा प्रभाव आहे. जीवन हे उपभोगासाठी आहे अशी तुमची धारणा असते. रसिक सौंदर्यासक्त वृत्तीने तुम्ही अनेक कलांचा आस्वाद घेता व इतरांनाही प्रवृत्त करता. चित्रकला, संगीत वगैरे मध्ये प्रावीण्य मिळवणे तुम्हाला सोपे जाते. आपले राहणीमान एका विशिष्ट दर्जाचे असावे असा तुमचा आगह असतो. उंची वस्त्रे, अत्तरे, अलंकार या गोष्टी तुम्हाला आवडतात. तसा तुमचा स्वभाव हळवा आहे. छोट्याशा अपयशाने तुम्हाला चटकन नैराश्य येऊ शकते. निसर्गसहवासाची तुम्हाला आवड आहे. अफाट पैसा लवकरात लवकर मिळवण्याचा प्रयत्न सोडून द्या. जुगारी प्रवृत्तीच्या नादी लागू नका. मोठा फटका बसल्यास मनावर परिणाम होऊन त्यातून बाहेर पडणे कठीण जाईल. मादक, द्रव्ये, मद्यपानाच्या आहारी जाऊ नका. नाहीतर निद्रानाश, किडनीचे विकार होतील. विलासाचा अतिरेक टाळा.

कार्यक्षेत्र : चैनीच्या वस्तू, अलंकार, तयार कपडे, सौंदर्यप्रसाधने यांच्या व्यापारात तुम्हाला फायदा होईल. या वस्तू तयार करणाऱ्या कंपन्यात तुम्हाला चटकन प्रवेश मिळेल व उत्कर्ष होईल. नाटक, चित्रपट, संगीत वाद्यवृंद या क्षेत्रात तुमच्या सजर्नशीलतेला वाव मिळेल. फॅशन डिझायनिंग, टेपरेकार्डर, टी.व्ही., कपडे धुण्याची यंत्रे, म्युझिक सिस्टिम अशी अनेक क्षेत्रे तुमच्या कलात्मक व तांत्रिक नैपुण्याला न्याय देतील.

प्रणयी जीवन : तुमची आकर्षणशक्ती जास्त असल्याने अगदी तरूण वयातच प्रीतीविवाह होण्याची शयता जास्त असते. आपला जोडीदार आपल्यासारखाच आनंदी, रसिक वृत्तीचा, रंगेल, शृंगारात रस घेणारा असावा अशी तुमची अपेक्षा असते. या दृष्टीने २१ एप्रिल तू २० मे किंवा सप्टेंबर २३ ते ऑक्टोबर २२ दरम्यान जन्मलेली व्यक्ती तुमच्या बहुतेक अपेक्षा पुर्ण करील.

वर्षफळ : खर्च भरपूर होणार असल्याने मोठ्या रकमेची तरतूद आधीच करून ठेवा. वडीलधाऱ्या माणसांचे आजार बळावतील. मित्रही ऐनवेळी आर्थिक मदतीची अपेक्षा करतील. जानेवारी फेबुवारीत दूरदृष्टीने घेतलेले निर्णय आर्थिक प्राप्ती वाढविण्यास कारणीभूत ठरतील. जून जुलै मध्ये पूर्वपरिचित व्यक्तीच्या स्नेहाचे रूपांतर प्रेमभावनेत होऊ शकेल. ऑक्टोबरमध्ये कार्यालयात अधिकार व मानाचे पद मिळू शकेल. अतिरिक्त पात्रता हस्तगत करा.

महत्वाचे वर्ष : ६, १५, २४, ३३, ४२, ५१, ६०, ६९.

भाग्यरत्न : हिरा

याच तारेखेची व्यक्ती :

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




# एसएस राजामौलीच्या आगामी जंगल ॲडव्हेंचरचित्रपटात महेश बाबूचे ८ वेगळे लूक्स



मुंबई -दाक्षिणात्य सुपरस्टार महेश बाबूचा 'गुंटूर कारम' हा चित्रपट अलिकडे रिलीज झाला होता. त्याच्या तमाम चाहत्यांनी यातील त्याच्या भूमिकेचं कौतुक केलं. त्याच्या आगामी चित्रपटाच्या घोषणेच्या प्रतीक्षेत असलेल्या चाहत्यांसाठी त्यानं आता खूशखबर दिली आहे. त्याचा आगामी चित्रपटाचे दिग्दर्शन एसएस राजामौली करणार आहे. या चित्रपटाचे तात्पुरते शीर्षक डडचइ२९ असे ठरवण्यात आलं आहे. राजमौली यांनी या चित्रपटाच्या निर्मिती प्रक्रियेला सुरुवात केली आहे. हा एक ग्लोब-ट्रोटिंग साहसी 'जंगल ॲडव्हेंचर' चित्रपट असल्याचे सांगण्यात येते. या चित्रपटाचे प्री प्रॉडक्शनचे काम सुरू झाले असून यासाठी महेश बाबूचा लूक बाबत चर्चा सुरू झाली आहे. या चित्रपटाचे लोकेशन्स सुंदर ठिकाणी होणार असून यासाठी जर्मनीच्या ब्लॅक फॉरेस्टपर्यंतचा शोध घेण्यासाठी प्रॉडक्शन टीम फिरत आहे.एसएस राजामौली दिग्दर्शित डडचइ२९ च्या लेटेस्ट अपडेटनुसार महेश बाबूचे या चित्रपटात वेगवेगळे आठ लूक असणार आहेत. हे लूक स्वत: एसएस राजामौली यांनी काळजीपूर्वक क्युरेट केले आहेत आणि त्याला अंतिम केले आहे. प्रॉडक्शन टीमने या प्रोजेक्टबद्दल काहीही बोलण्यास नकार दिला आहे.

त्यामुळे चाहत्यांची याबद्दलची उत्सुकता अधिकच ताणली आहे.

आरआरआर चित्रपटाला जगभर मिळालेल्या लौकिकानंतर एसएस राजामौलींचा हा पहिलाच आगामी चित्रपट आहे. त्यामुळे त्याच्याही चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता आहे.

'आरआरआर' चित्रपटातील 'नाटू नाटू' या गाण्याला ऑस्कर पुरस्कारांने गौरवण्यात आले होते. यासाठी एमएम किरवणी यांच्या साउंडट्रॅकमागील संगीतातील प्रतिभा, पुन्हा एकदा महेश बाबू अभिनीत राजामौलीच्या आगामी चित्रपटातही पाहायला मिळणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला दुर्गा आर्ट्स अंतर्गत केएल नारायण यांचे पाठबळ लाभले आहे.

असे असले तरी, उत्सुक चाहत्यांना संयम बाळगण्याची आवश्यकता असू शकते कारण एएइँ२९ च्या निर्मितीसाठी दोन ते तीन वर्षे लागणार आहे. हेच राजमौली यांच्या सूक्ष्म चित्रपट निर्मिती प्रक्रियेचे वैशिष्ट्य आहे. या चित्रपटाच्या लेखनाची जबाबदारी 'बाहुबली', 'आरआरआर' सारख्या चित्रपटाचे लेखक आणि राजामौलीचे वडील विजयेंद्र प्रसाद यांच्यावर सोपवण्यात आली आहे. या चित्रपटात विदेशी कलाकारांसह अनेक कलाकारांचा समावेश असल्याची चर्चा आहे आणि या चित्रपटाचे अंदाजे बजेट १ हजार कोटींचे असेल.

# पीएम सूर्य घर मोफत वीज योजना





प्रतिकुटुंब १५ हजार रुपयांची बचत करणारी एक परिवर्तनकारी योजना अर्ज करण्याची आणि रूफटॉप सोलर योजनेअंतर्गत अनुदान मिळविण्याची प्रक्रिया पीएम सूर्य घर मुफ्त बिजली (मोफत वीज) योजना काय आहे?, तर पीएम सूर्य घर मुफ्त बिजली योजना ही केंद्र सरकारची योजना असून, आपल्या घराच्या छतावर सौर ऊर्जा संच बसविण्याचा निर्णय घेणाऱ्या भारतातील एक कोटी कुटुंबांना मोफत वीज उपलब्ध करून देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. यामध्ये संबंधित कुटुंबांना दरमहा ३०० युनिट मोफत वीज उपलब्ध होणार आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने २९ फेब्रुवारी रोजी मंजूर केलेली ही एक महत्त्वाकांक्षी योजना असून, यासाठी ७५,०२१ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.पीएम सूर्य घर मुफ्त बिजली योजना कशी काम करते?या योजनेअंतर्गत २ किलोवॅट क्षमतेपर्यंतच्या संचासाठी सौर युनिट खर्चाच्या ६०% आणि २ ते ३ किलोवॅट दरम्यान क्षमतेच्या संचासाठी अतिरिक्त प्रणाली खर्चाच्या ४० टक्के अनुदानाची तरतूद आहे. अनुदानाची मर्यादा ३ किलोवॅट क्षमतेपर्यंत ठेवण्यात आली आहे. म्हणजेच, सध्याच्या सर्वोत्तम किमतींनुसार १ किलोवॅट क्षमतेच्या संचासाठी ३०,००० रुपये अनुदान, २ किलोवॅट क्षमतेच्या संचासाठी ६०,००० रुपये आणि ३ किलोवॅट किंवा त्याहून अधिक क्षमतेच्या प्रणालीसाठी ७८,००० रुपये अनुदान मिळेल.

या योजनेसाठी अर्ज करायला कोण असणार पात्र?१. अर्जदार भारतीय नागरिक असणे आवश्यक आहे. २. सौर पॅनेल बसविण्यासाठी योग्य छप्पर असलेले घर असणे आवश्यक आहे. ३. कुटुंबाकडे वैध वीज जोडणी असणे आवश्यक आहे. ४. सौर

पॅनेलसाठी कुटुंबाने इतर कोणत्याही अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा.-एस. काने/आर. अगाशे/पी. कोर सर्वप्रथम, इच्छुक ग्राहकाला ु.ीििूरसहरी.सीं.ळप या राष्ट्रीय पोर्टलवर नोंदणी करावी लागेल. आपले राज्य आणि वीज वितरण कंपनीची निवड करून त्यानंतर हे करावे लागेल. राष्ट्रीय पोर्टल, संबंधित कुटुंबांना सौर संचाचा योग्य आकार, फायदे मोजणारी यंत्रणा,

विक्रेता क्रमवारी इ. सारखी संबंधित माहिती प्रदान करून मदत करेल. ग्राहकांना विक्रेत्याची आणि आपल्या घराच्या छतावर बसविण्यासाठी विशिष्ट बनावटीच्या सौर ऊर्जा संचाची निवड करता येईल.सौर ऊर्जा संचासाठी ग्राहक कर्ज सुविधेचा लाभ घेऊ शकतो का?

होय. ३ किलोवॅटपर्यंतची निवासी आरटीएस प्रणाली बसविण्यासाठी कुटुंबांना सध्या सुमारे ७% तारणमुक्त कमी व्याजाचे कर्ज मिळविता येईल. भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी ठरवलेल्या प्रचलित रेपो दरापेक्षा ०.५% अधिक व्याजदर निश्चित करण्यात आला आहे. रेपो दर, जो सध्या ६.५% आहे, तो ५.५% इतका कमी झाला, तर ग्राहकांसाठी प्रभावी व्याजदर सध्याच्या ७% ऐवजी ६% इतका राहील.

अनुदानाचा लाभ घेण्यासाठी प्रक्रियेच्या पायऱ्या कोणत्या?पहिली पायरी : पोर्टलवर पुढील गोष्टींची नोंदणी करा. आपले राज्य आणि वीज वितरण कंपनी निवडा.आपला वीज ग्राहक क्रमांक, मोबाइल क्रमांक आणि ईमेल प्रविष्ट करा.

पायरी दुसरी : ग्राहक क्रमांक आणि मोबाइल क्रमांकासह लॉगिन करा. अर्जातील सूचनांनुसार रूफटॉप सौर ऊर्जा प्रणालीसाठी अर्ज करा.

तिसरी पायरी : व्यवहार्यता मंजुरी मिळाल्यावर, कोणत्याही नोंदणीकृत विक्रेत्याकडून आपल्या घराच्या छतावर सौर ऊर्जा संच स्थापित करा.

पायरी चौथी : संच बसवण्याचे काम पूर्ण झाल्यावर, प्लांटबाबतचा तपशील सबमिट (जमा) करा आणि नेट मीटरसाठी अर्ज करा.

पाचवी पायरी : नेट मीटर बसविल्यानंतर आणि डिस्कॉमद्वारे तपासणी केल्यानंतर पोर्टलवरून कमिशनिंग (मंजुरी) प्रमाणपत्र तयार केले जाईल.

पायरी सहावी : कमिशनिंग अहवाल मिळाल्यावर पोर्टलच्या माध्यमातून बँक खात्याचे तपशील आणि रद्द केलेला चेक सबमिट करा. तुमचे अनुदान तुमच्या बँक खात्यात ३० दिवसांच्या आत जमा होईल.रूफटॉप सोलर योजनेची निवड का करावी?

साधे अर्थशास्त्र. लाभार्थी कुटुंबे आपल्या विजेच्या बिलाची बचत करू शकतील, तसेच आपल्या जवळची अतिरिक्त वीज डिस्कॉमला विकून अतिरिक्त उत्पन्न मिळवू शकतील.

पीएम सूर्य घर मुफ्त बिजली योजना ३ किलोवॅट क्षमतेचे रूफटॉप सोलर युनिट बसवून महिन्याला ३०० युनिट्सपर्यंत वीज वापरणाऱ्या कुटुंबांची वर्षाला अंदाजे १५,००० रुपयांची बचत करण्याचे आश्वासन देते. यामुळे स्वतःची वीज उत्पन्न करणाऱ्या संबंधित कुटुंबांच्या वीज बिलात सुमारे १,८०० ते १,८७५ रुपये इतकी बचत होईल.

सौर युनिटला वित्तपुरवठा करण्यासाठी घेतलेल्या कर्जावरील ६१० रुपयांचा ईएमआय (हप्ता) वजा केल्यावरही, दरमहा सुमारे १,२६५ रुपये किंवा वर्षाला अंदाजे १५,००० रुपये बचत होईल. कर्ज न घेणाऱ्या कुटुंबांची त्याहूनही अधिक बचत होईल. नवीकरणीय ऊर्जेची निवड करून, हरित गृहासाठी योगदान देण्याची ही एक उत्तम संधी आहे.

# स्वागतार्ह निकाल





विशेषाधिकारांची झूल पांघरून संकेत झुगारणाऱ्या लोकप्रतिनिधींना सर्वोच्च न्यायालयाने खडे बोल सुनावले आहेत. कोणीही कायद्यापेक्षा मोठा नाही, ही भूमिका केंद्र सरकारने या खटल्यात मांडली. ते देखील दिलासा देणारे आहे.

लाचखोरीच्या प्रकरणात अडकलेल्या लोकप्रतिनिधींवर गुन्हा नोंदविण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. लाचखोरी, भ्रष्टाचार यामध्ये लोकप्रतिनिधींना विशेषाधिकारांचे संरक्षण मिळणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निर्णय ऐतिहासिक मानावा लागेल. संसद किंवा विधिमंडळ सदस्याच्या भ्रष्टाचार, लाचखोरीमुळे संसदीय लोकशाहीचा पाया ठिसूळ होतो, अशा घटनांमुळे राज्यघटनेच्या तत्त्वांना धक्का बसतो आणि राजकारण्यांकडून नागरिकांशी प्रतारणा होते, असे मत सर्वोच्च न्यायालयाने हा निकाल देताना व्यक्त केले आहे. मतदारांचे हितरक्षण करण्याच्या नावाखाली निवडून येणाऱ्या आणि प्रत्यक्षात स्वहिताला प्राधान्य देत अमाप संपत्ती गोळा करणाऱ्या राजकारण्यांना हा इशारा आहे. लोकप्रतिनिधी होणे म्हणजे कसेही वर्तन करण्याचा परवाना नव्हे आणि तसा समज असल्यास विशेषाधिकाराची कवचकुंडले मिळणार नाहीत, हे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायालयीन खटले म्हणजे तारखांवर तारखा, हे चित्र बदलावे, अशी अपेक्षा सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी नुकतीच व्यक्त केली. आताचा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लोकशाही आणि सर्वसामान्य नागरिकांचे हित यासाठी अतिशय उपयुक्त असला तरी हा खटला 'तारीख पे तारीख'चे ठळक उदाहरण होय! पी.व्ही. नरसिंह राव यांचे सरकार झारखंड मुक्ती मोर्चाच्या खासदारांमुळे वाचले होते. त्यावेळी हे प्रकरण न्यायालयात गेले. १९९३ च्या खटल्याचा निकाल १९९८ मध्ये आला. लोकप्रतिनिधींच्या विशेषाधिकाराच्या मुद्द्यावर संशयित लाचखोर खासदारांना संरक्षण मिळाले. २०१२ च्या राज्यसभा निवडणुकीत हेमंत सोरेन यांच्या कुटुंबातील सीता सोरेन यांच्यावर विशिष्ट उमेदवाराला लाच घेऊन मत दिल्याचा आरोप होता. १९९८ चा निकाल रद्द ठरवीत सर्वोच्च न्यायालयाने लाचखोर लोकप्रतिनिधींना दणका दिला आहे.


**राजकीय पक्षांची सोयीची भूमिका**

तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांना पैसे घेऊन प्रश्न विचारल्याच्या आरोपावरून खासदारकी गमवावी लागली. संसदेच्या शिस्तपालन समितीने ही कारवाई केली. आपल्या खासदाराचे वर्तन तपासण्याऐवजी तृणमूलच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांनी हा लोकशाहीचा विश्वासघात आहे' अशी भूमिका घेण्यात धन्यता मानली. देशातील एका उद्योगपतीसंबंधी परदेशात स्थायिक झालेल्या दुसऱ्या उद्योगपतीने मोईत्रा यांच्या मार्फत प्रश्न विचारणे धक्कादायक होते. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे पंतप्रधानांनी स्वागत केले आहे, मात्र एकेकाळी त्यांच्याच पक्षाचे तेव्हाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवानी यांनी ममतांसारखीच भूमिका घेतली होती. कोब्रा पोस्ट' या पोर्टलने केलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये अडकलेल्या अकरा खासदारांपैकी सहा जण भाजपचे होते. त्यांना बडतर्फ करण्यात आल्यावर कांगारु कोर्टा'चा निर्णय, असे म्हणत त्यांनी कांगावा केला.

थोडक्यात, लोकशाहीचे तत्त्व इतरांनी पाळले पाहिजे, हीच कमी-अधिक प्रमाणात राजकीय पक्षांची भूमिका राहिली आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात अनेक समस्या आहेत. यापैकी आपल्या रोजच्या जगण्याशी संबंधित पिण्याचे पाणी, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था, रस्ते अशा बाबतीतील माफक अपेक्षा लोकप्रतिनिधींनी पूर्ण कराव्यात, ही मतदारांची भावना असते. त्याही अनेकदा पूर्ण होत नाहीत आणि पाच वर्षांनंतर पुन्हा त्याच - त्या आश्वासनांचा पाऊस पाडला जातो. मध्यंतरी राज्यसभेचे खासदार धीरज साहू यांच्या घरात सापडलेली रोकड मोजताना यंत्रेदेखील अपुरी पडली! राजकारणात ध्येयवाद वगैरे शब्द आजघडीला कालबाह्य झाले आहेत. पैशासाठी सत्ता आहे, हा समज नागरिकांच्या उदासीनतेमुळे राजकारण्यांमध्ये भिनत गेला. सर्वसामान्य नागरिक रोजच्या जगण्यातील संघर्षात गुंतलेले असतात.

त्यामुळे उदासीनतेसाठी त्यांना दोष देणे चुकीचेच होईल. शिवाय, पैशाशिवाय राजकारण शक्य नाही ही स्थिती असल्याने सामान्यांसमोर देखील लोकप्रतिनिधी निवडीचे पर्याय फार कमी असतात. या पार्श्वभूमीवर भ्रष्ट लोकप्रतिनिधींवर कायद्याचा धाक निर्माण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय मोलाचा ठरेल.

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द

१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# यशवंत धाराशिव जिल्हा

गुरूवार दि. ०७ मार्च २०२४

६

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com


## नारी शक्ती वंदन कार्यक्रमास महिलांसह पुरुषांचा प्रतिसाद

परंडा दि.६ (प्रतिनिधी) – भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा विधानसभेच्यावतीने नारी शक्ती वंदन कार्यक्रम अंतर्गत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचे लाईव्ह प्रक्षेपण परंडा येथील भाजपा संपर्क कार्यालयात दि.६ मार्च रोजी करण्यात आले होते. प्रधानमंत्री मोदी यांनी महिला योजना, महिला सबलीकरण, महिलांची सुरक्षा यावर मार्गदर्शन केले.



यावेळी जिल्हा चिटणीस वनीता कटाळे, परंडा विधानसभा महिला मोर्चा प्रमुख ॲड शेलार, जिल्हा उपाध्यक्ष तिवारी, महिला मोर्चा परंडा तालुकाध्यक्षा नूतन खोसरे, परंडा शहराध्यक्ष ज्योती भातलंवडे, डोमगाव ग्रामपंचायत सदस्य पाटील यांच्यासह जिल्हा सरचिटणीस विकास कुलकर्णी, जिल्हा चिटणीस सुजित परदेशी, परंडा तालुका सरचिटणीस धनाजी गायकवाड, भाजयुमो जिल्हा चिटणीस रामकृष्ण घोडके, तालुका सरचिटणीस अरविंद रगडे, विलास खोसरे, उमाकांत गोरे, बबन लिमकर, मनोज पवार, जयंत भातलंवडे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या उपस्थित होते.

# धाराशिव येथून १४५० राम भक्त श्रीराम लल्लाच्या दर्शनासाठी आयोध्याकडे रवाना

## आ. पाटील, आ. पवार, ठाकूर यांनी दाखविला हिरवा झेंडा

### हा आनंदाचा, अभिमानाचा व स्वप्नपूर्ती चा क्षण – ठाकूर

आयोध्येत श्रीराम मंदीर निर्मितीसाठी झालेल्या दोन्ही ही कारसेवेत आपण भाजपा कार्यकर्त्यांसह सहभागी झालो होतो. १४ दिवस वाराणसीच्या कारागृहात हजारो रामभक्तांसह बंद होतो , कधी स्वप्नात ही वाटले नव्हते की हा आनंदाचा क्षण रामभक्तांच्या आयुष्यात येईल परंतु देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या शुभहस्ते भगवान श्रीराम लल्लांचे भव्य दिव्य मंदीर आयोध्येत उभारण्यात आले आहे, या मंदीरातील भगवान श्रीरामाच्या दर्शनासाठी धाराशिव लोकसभा मतदार संघातील हजारो रामभक्त आज विशेष रेल्वेने आयोध्येकडे रवान । होत आहेत हा क्षण माझ्यासह असंख्य रामभक्तांसाठी आनंदाचा व स्वप्नपूर्तीचा आहे.

### रामभक्तांना लवकर संधी दिल्याबद्दल आभार –आ. पवार

संपूर्ण हिंदुस्थानातील श्रीराम भक्त आयोध्येतील भगवान श्रीरामाच्या दर्शनासाठी आसुसलेले आहेत. धाराशिव लोकसभा मतदारसंघातील श्रीराम भक्तांसाठी ही संधी केंद्रीय भाजपाने व राज्य भाजपाने लवकर उपलब्ध केल्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. आयोध्येतील श्रीरामाच्या दर्शनाने या सर्व श्रीराम भक्तांमध्ये नव चैतन्य व ऊर्जा निर्माण होऊन ते सर्व मोदीजींना पुन्हा पंतप्रधान करतील असे मत आमदार अभिमन्यू पवार यांनी यावेळी व्यक्त केले.

### श्रीराम भक्तामध्ये नवचैतन्य व ऊर्जा – आ .पाटील

विशेष आस्था रेल्वेच्या माध्यमातून धाराशिव लोकसभा मतदारसंघातील श्रीराम भक्ताचा हा पाच दिवसांचा अयोध्या प्रवास आहे. त्यांची राहण्याची व जेवणाची सोय करण्यात आली असून अयोध्येत पोहचल्यानंतर श्रीराम भक्तांचे श्री राम लल्लाचे व्यवस्थित दर्शन होण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. प्रभू श्रीरामचंद्राच्या दर्शनाने नवचैतन्य व ऊर्जा घेऊन हे सर्व आई तुळजाभवानीच्या जिल्ह्यातील रामभक्त धाराशिव मध्ये असा विश्वास आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी यावेळी व्यक्त केला आहे.



### रामराज्याची सुरुवात हा राम भक्तासाठी आनंदाचा व ऐतिहासिक क्षण– काळे

राम राज्याची सुरुवात ही धाराशिव लोकसभा मतदारसंघातील आपल्यासारख्या राम भक्ताच्या राम लल्लाच्या दर्शनाने होत आहे, हा आनंदाचा क्षण आहे. अयोध्येहून राम लल्लांचे दर्शन घेऊन जाणाऱ्या नागरिकांच्या दृष्टीने अतिशय आनंदाचा आणि ऐतिहासिक क्षण असणार आहे महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीचा आशीर्वाद व राम लल्लांचा आशीर्वाद हा देशाच्या विकासाच्या दृष्टीने कौल देणारा राहील असा आशावाद भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष तथा लोकसभा निवडणूक प्रमुख नितीन काळे यांनी व्यक्त केला.भाजपा जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य यांनीही दर्शनाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल भाजपा नेतृत्वाचे आभार व्यक्त करून जिल्हाभरातून आलेल्या राम भक्तांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – धाराशिव लोकसभा मतदारसंघातील जवळपास १४५० हून अधिक श्रीराम भक्तांना घेऊन भगवान श्रीरामाच्या दर्शनासाठी आयोध्याकडे दि.५ मार्च रोजी मराठवाडयातील पहिली विशेष आस्था रेल्वे धाराशिव स्थानकातून हजारो रामभक्तांच्या उपस्थितीत जय श्रीराम च्या जयघोषात आयोध्येकडे रवाना झाली.

जवळपास वीस बोगीच्या या रेल्वेमधून १४५० हून अधिक रामभक्त आयोध्येकडे रवाना झाले आहेत. या सर्व श्रीराम भक्तांना घेऊन अयोध्येस जाणाऱ्या या रेल्वेस माजी मंत्री आमदार राणाजगजीत सिंह पाटील , आमदार अभिमन्यू पवार, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी हिरवा झेंडा दाखविला. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, नितीन काळे , सहकार आघाडीचे प्रदेश सहसंयोजक दत्ताभाऊ कुलकर्णी , प्र.का. सदस्य ॲड. व्यंकटराव गुंड, अनिल काळे, बाळासाहेब शिरसागर, प्रवीण पाठक, विकास कुलकर्णी, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजसिंह राजेनिंबाळकर, नेताजी पाटील, दीपक आलुरे , संतोष बोबडे, सचिन रोचकरी , युवराज नळे , विश्व हिंदू परिषदेचे विजयकुमार वाघमारे, श्रीकृष्ण धर्माधिकारी यांच्यासह भाजपाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व हजारो रामभक्त उपस्थित होते. या विशेष आस्था रेल्वेने हे सर्व रामभक्त भगवान श्रीराम लल्लाच्या दर्शनासाठी आयोध्याकडे रवाना झाले. या सर्व राम भक्ताची जेवणाची व इतर व्यवस्था आयआरसीटीसी च्या माध्यमातून रेल्वेतच केली जाणार असून सुरक्षेची व इतर व्यवस्था केली आहे. ही विशेष रेल्वे दि. ७ मार्च रोजी ११.५० वाजता आयोध्येत पोहोचेल दिनांक सात व आठ मार्च रोजी भगवान श्रीरामाचे दर्शन घेऊन हे सर्व श्रीराम भक्त रात्री ८–२० वाजता दि. ८ मार्च रोजी धाराशिवकडे रवाना होणार आहेत दि १० मार्च रोजी ही रेल्वे दुपारी १ वाजता धाराशिव येथे पोहोचणार आहे. गेल्या अनेक वर्षाच्या स्वप्नपूर्तीचा व आनंदाचा हा क्षण श्रीराम भक्तांना या रेल्वेच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्याबद्दल आ राणाजगजितसिंह पाटील, आ अभिमन्यू पवार, आ.राजेंद्र राऊत, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांचे रामभक्तांनी आभार मानले आहेत जय श्रीरामच्या जय घोषात मोठ्या उत्साहात ही रेल्वे धाराशिव रेल्वे स्थानकातून हजारो रामभक्तांना घेऊन आयोध्याकडे रवाना झाली आहे .

# आज शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांची जिल्ह्यात तोफ धडाडणार

## औसा, उमरगा, तुळजापूर, कळंब व भूम येथे जनसंवाद

धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे हे धाराशिव लोकसभा मतदार संघात जनसंवाद यात्रा करणार आहेत. या यात्रेत ते ५ ठिकाणी जाहिर सभाव्दारे जनतेशी संवाद साधणार आहेत. त्यामुळे औसा, उमरगा, तुळजापूर, कळंब व भूम येथे ठाकरे यांची दि.७ व ८ मार्च असे २ दिवस त्यांची तोफ धडाडणार आहे.



उध्दव ठाकरे हे दि. मार्च रोजी खाजगी विमानाने लातूर एअरपोर्ट येथे दुपारी १२ वाजता पोहोचणार असून १२.३० वाजता औसा येथे विजय मंगल कार्यालयात सभा घेणार आहेत. त्यानंतर लामजना, किल्लारी, नारंगवाडी पाटी, नाईचाकुर, कासारशिरसी, मुळज मार्गे उमरगा असा प्रवास करणार आहेत. तसेच सायंकाळी ४ वाजता उमरगा येथे कै. शिवाजी दादा मोरे क्रीडा संकुल, छत्रपती शिवाजी कॉलेज येथे सभा होणार आहे. त्यानंतर तुळजापूर येथे संध्याकाळी ७ वाजता तुळजापूर येथील डॉ आंबेडकर चौकात सभा होणार आहे. तर तुळजापुरची सभा संपल्यानंतर धाराशिव शहरातील पुष्पक मंगल पार्क येथे मुक्काम करणार आहेत. तसेच दि.८ मार्च रोजी पुष्पक पार्क येथून आळणी फाटा, ढोकी येथे स्वागत होणार असून ते कळंबकडे रवाना होणार आहे त. तर कळंब येथील मार्केट यार्डात सकाळी ११ वाजता सभा घेणार आहेत. त्यानंतर कळंबहून येरमाळा येथे स्वागत होणार असून बार्शी तालुक्यातील कुसळंब बायपास मार्गे परंडाकडे जाणार आहेत. तर परंडा तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्यावतीने त्यांचे स्वागत होणार असून ते परंडाहून सोनारीकडे जाणार आहेत. त्यानंतर अनाळा वालवड मार्गे भूमकडे जाणार आहेत. तसेच भूम येथील नगर पालिकेसमोरील चौकात सायं. ४ वाजता सभा घेणार आहेत. तर सभा संपल्यानंतर भूमहून छत्रपती संभाजी नगर एअरपोर्टकडे प्रयाण करणार आहेत. शिवसेनेमध्ये फूट पडल्यानंतर उद्धव ठाकरे यांचा धाराशिव जिल्ह्यातील पहिलाच दौरा असल्यामुळे शिवसैनिकांमध्ये यामुळे नवचैतन्य निर्माण झाले आहे.

## मुलींच्या जन्माचे प्रमाण वाढण्यासाठी जिल्हा समिती सतर्क - डॉ.मुल्ला

धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – जिल्ह्याला २ राज्यांच्या सीमा लागून आहेत. महाराष्ट्राच्या तुलनेत इतर राज्यांमध्ये गर्भपात करण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे येथील गरोदर महिला तिकडे जाऊन अवैध गर्भपात करण्याच्या घटनाही घडल्या आहेत. गेल्यावर्षी जिल्हा पीसीपीएनडीटी समितीने गुलबर्गा येथे याची कारवाई केली होती. जिल्ह्यात पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत असून मुलींच्या जन्माचे प्रमाण वाढण्यासाठी जिल्हा सल्लागार समिती सतर्क असल्याचे प्रतिपादन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.इस्माईल मुल्ला यांनी दि.६ मार्च रोजी केले.

डॉ.मुल्ला यांच्या अध्यक्षतेत जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.तानाजी लाकाळ, पीसीपीएनडीटी नोडल अधिकारी डॉ. दत्तात्रय खुणे, जिल्हा शासकीय अभियोक्ता ॲड.शरद जाधवर, आयएमए अध्यक्ष डॉ.सचिन देशमुख, वरिष्ठ स्त्री रोग तज्ञ तथा वैद्यकीय अधीक्षक डॉ.स्मिता गवळी–सरोदे, पीसीपिएनडीटी कायदे विषयक सल्लागार ॲड.रेणुका शेटे व माहिती अधिकारी यासेरोद्दीन काझी आदी उपस्थित होते. या बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. संशयित सोनोग्राफी केंद्रावर डिकॉय केस करणे, सोनोग्राफी केंद्र तसेच गर्भपात केंद्राची त्रैमासिक तपासणी करणे, विविध बैठकांचे आयोजन करणे, सोनोग्राफी केंद्राचे नूतनीकरण यासह विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र लिंग निवडीस प्रतिबंध कायद्याची प्रभावीपणे



अंमलबजावणी करण्यासाठी व मुलींच्या जन्माचे प्रमाण वाढण्यासाठी जिल्हा सल्लागार समिती सतत सतर्क असून दर दोन महिन्यांना पीसीपीएनडीटी जिल्हा सल्लागार समितीची बैठक घेण्यात येते. जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविण्यासाठी विविध उपयोजना केल्या जात आहेत. जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर बैठका घेऊन पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केली जाते. जिल्ह्यात तालुकास्तरावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर प्रमाण वाढण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेऊन अवैधरीत्या गर्भलिंग निदान अथवा गर्भपात होत असल्यास पीसीपीएनडीटी सेल, जिल्हा रुग्णालय अथवा तालुकास्तरावर त्या कार्यक्षेत्रातील उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय येथे संपर्क साधून माहिती द्यावी अथवा टोल फ्री क्रमांक १८००२३३४४७५ या क्रमांकावर गोपनीय माहिती देण्यात यावी. ही माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. दिलेली माहिती खरी असल्यास गुन्हा दाखल झाला असता माहिती देणाऱ्यास राज्यस्तरावरून खबरी योजने अंतर्गत १ लाख रुपये बक्षीस देण्यात येईल, असे माहिती डॉ मुल्ला यांनी सांगितले.

## मासेमारीसाठी बोली पध्दतीने तलाव मिळणार

धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील ५०० हेक्टरखालील जलक्षेत्र असलेल्या बाणगंगा मध्यम प्रकल्प (सरासरी जलक्षेत्र ८९.६५ हेक्टर) हा पाटबंधारे तलाव मासेमारीसाठी ठेक्याने देण्या संदर्भात शासनाने २०१९ मध्ये निर्णय घेतला आहे. या निर्णयातील तरतुदीनुसार जिल्ह्यातील मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थे अंतर्गत (बोली) जाहीर लिलाव पध्दतीने ठेक्याने देण्यासाठी १५ फेब्रुवारी रोजी सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय, धाराशिव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तलाव ठेका समितीची सभा पार पडली. सभेमध्ये जिल्ह्यातील बाणगंगा मध्यम प्रकल्प हा पाटबंधारे तलाव जाहीर लिलाव पध्दतीने ठेक्याने देण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

लिलावातील तलावाचे नांव, न्युनतम ठेका रक्कम, तलाव ठेका सुरक्षा अनामत रक्कम व वार्षिक इष्टतम मत्स्य बोटुकली संचयन किंमतीच्या १० टक्के रक्कम तसेच अटी व शर्ती सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्यास उपलब्ध आहे. त्यामुळे पात्र संस्थांनी बोली प्रक्रियेत भाग घ्यावा असे आवाहन मत्स्य व्यवसायचे सहायक आयुक्तांनी केले आहे. परंतू भूजलाशयीन मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था नोंदणीसाठी सुधारित निकषानुसार ५०० हेक्टरच्या आतील एखाद्या तलावावर नोंदणी असलेली संस्था काही कारणास्तव काळ्या यादीत किंवा बंद असल्यास लगतच्या ५ कि.मी. अंतराच्या आतील संस्थेचे त्या तलावावर त्या कालावधीकरिता निर्धारण करण्यात यावे. या तरतुदीनुसार जर पात्र संस्थेचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास अशा परिस्थीतीत बाणगंगा मध्यम प्रकल्प हा पाटबंधारे तलाव बोली लिलावाद्वारे ठेक्याने न देता शासनाच्या तरतुदीनुसार ठेक्याने देण्याची कार्यवाही करण्यात येईल. बोली लिलावात भाग घेण्यास इच्छूक जिल्ह्यातील मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थानी अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता दि.१५ मार्च रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत करून सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय या कार्यालयास सादर करावे.

# बोरी धरणाचे पाणी चोरी करणाऱ्यांच्या मोटारी जप्त

## प्रशासनाच्या धडाकेबाज कारवाईने धाबे दणाणले



नळदुर्ग दि.६ (प्रतिनिधी) – येथील बोरी धरणावर काही असंतुष्ठ नागरिक चक्क मोटार लावून शेतीला पाणी देत असल्याचे दिसून आल्यामुळे संबंधित विभागाला गोपनीय माहिती मिळाली. त्यामुळे धरणावरुन पाणी उपसा करीत असलेल्या शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारी जप्त केल्या आहेत.

तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथील बोरी धरणातून पाणी उपसा करीत असलेल्या मोटारी जप्त करण्याची कारवाई करण्यात आली. यामध्ये मंडल अधिकारी जयंत गायकवाड, तलाठी विश्वास वायचाळ, पाटबंधारे विभागाचे कर्मचारी एन.एम. पवार, एम.एन. गायकवाड, महावितरणचे कर्मचारी महेश जाधव व दत्तात्रय सर्जे यांनी बोरीधरणावर जाऊन अचानक धाड घालून ते पाणी चोरी करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मोटारी जप्त करुन संबंधितावर कारवाई करण्यात आली आहे. तुळजापूर तालुक्याला पाणी प्रश्न भेडसावत असताना पाण्यावर डल्ला मारणाऱ्याचे धाबे मात्र दणाणले आहेत. पाणी हे एक नैसर्गिक संसाधन आहे पाणी मानवाच्या जीवनातील खुप महत्वाचा मुलभूत घटक आहे. सजीव प्राण्याचे मानवाचे अस्तित्व जीवन हे पाण्यावर अवलंबून आहे. काही असंतुष्ट माणसे पाणी जपून वापरत नसल्याने अशा व्यक्तींवर नगर परिषद प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला पाहिजे. पाणी काटकसरीने वापरण्याची आजच्या काळाची गरज असून ती प्रत्येकांची जबाबदारी सुद्धा आहे.

बोरी धरणातील पाणी साठा केवळ ६ टक्के असून पाण्यासाठी नागरिकांची भटकंती होऊ नये टाळण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पाण्याचा काटकसरीने वापर करावा. पाणी वाया घालवू नये, प्रत्येकाने आपल्या नळाला तोटी बसवून घ्यावी व पाण्याचा सांभाळ करावा असे आवाहन नळदुर्ग नगर परिषदेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार व मंडल अधिकारी जयंत गायकवाड यांनी केले आहे. बोरी धरणावर पकडलेल्या मोटारी पाटबंधारे विभागाच्या ताब्यात दिल्या असून आता पाटबंधारे विभाग या चोरट्यांवर कोणती कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पाणी साठवून ठेवण्याची सर्व जबाबदारी पाटबंधारे विभागाची असून याकडे पाटबंधारे विभागाची डोळेझाक होत आहे. त्यामुळे पाटबंधारे विभागाने पाणी प्रश्नाकडे कानाडोळा न करता असे प्रश्न डोळ्यासमोर ठेवून पाणी चोरणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

## आज गुंतवणूकदार व व्यावसायिकांसाठी जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद

धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील उद्योग क्षेत्रामध्ये गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी गुंतवणूकदार आणि व्यवसायिक यांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याकरिता जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन केले आहे.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या अध्यक्षतेत व जिल्हाधिकारी.डॉ.सचिन ओंबासे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही परिषद होणार आहे.

जिल्हास्तरीय गुंतवणूकदार आणि व्यवसायिकांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करुन देणे, जिल्हयाला विकासाचा केंद्रबिंदू मानून जिल्हयाच्या आणि राज्याच्या विकासाला चालना देणे हा या परिषदेच्या आयोजनामागील उद्देश आहे. जिल्हास्तरीय कार्यक्रमामध्ये जिल्हयातील प्रमुख उद्योग क्षेत्राबाबत चर्चासत्र, गुंतवणूकीच्या संधी, इतर क्षमता असलेल्या क्षेत्रातील गुंतवणूक व व्यवसाय संधीबाबत चर्चा, सामंजस्य करार स्वाक्षरीबाबत कार्यक्रम, उद्योजकांचे अनुभव आदी बाबींचा समावेश आहे. त्यात प्रतिनिधीक स्वरुपात जिल्हयाच्या उत्पादनांचे प्रदर्शन, निर्यातक्षम उत्पादने, भौगोलिक मानांकने, असलेली उत्पादने, एक जिल्हा एक उत्पादन, जिल्ह्यातील स्थापित औद्योगिक समुह, विविध योजनांचे लाभार्थी यांची उत्पादने यांचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे.

जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मैत्री कक्ष, उद्योग संचालनालय, मुंबई सीडबी बैंक, जिल्ह्यातील बँका, जिल्हयातील उद्योजक संघटना, शैक्षणिक संस्था, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, मिटकॉन, कौशल्य विकास व रोजगार आणि जिल्ह्यातील संबंधित शासकीय यंत्रणांचे प्रमुख यांच्या सहकार्याने ही परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद धाराशिव शहरातील एमआयडीसी परिसरातील हॉटेल ऍपल येथे सकाळी १०.३० वाजता होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व उद्योजक संघटना, उद्योजक, शेती उत्पादक संस्था व नव उद्योजक यांनी गुंतवूणक परिषदेस उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल बळे यांनी केले आहे.

# आई- वडीलांचे पाठबळ हीच यशाची गुरुकिल्ली : महेशकुमार मारापल्ले

चाकूर ( वार्ताहर ) - येथील भाई किशनराव देशमुख महाविद्यालयात करिअर कट्टा अंतर्गत दि. ४ मार्च २०२४ सोमवार रोजी सकाळी १०.३० वाजता प्र. प्राचार्य डॉ. जनाईन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली , केंद्रीय अन्न सुरक्षा अधिकारी, महेशकुमार मारापल्ले यांचे राज्यस्तरीय आणि केंद्रीय विविध परीक्षा तसेच सेंट्रल व राज्य फूड सेफ्टी ऑफिसर परीक्षा संदर्भात मागदर्शन आयोजित करण्यात आले होते, प्रमुख उपस्थिती मध्ये समन्वयक प्रा. डॉ. शिवानंद गिरी, सौ. वैष्णवी मारापल्ले, विद्यार्थी प्र. रत्नदीप शिवनगे उपस्थित होते. प्रथम भाई किशनराव देशमुख यांच्या प्रतिभेला मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी बोलतांना मारापल्ले म्हणाले प्रत्येक पदवी ही तेवढीच महत्वाची असते परंतु विद्यार्थ्यांनी स्कोप चा विचार केला पाहीजे. जि. प. शाळेतुन शिक्षण घेऊन आई- वडील व गुरुजन यांच्या प्रेरणेतुनच केंद्रीय अन्न सुरक्षा अधिकारी झालो, ज्या विद्यार्थ्याला अपयश पचवता येते तोच जीवनात यशस्वी होऊ शकतो, स्पर्धा परीक्षा ही राज्याची असो की केंद्राची , प्रत्येक स्पर्धा परीक्षेची प्रथम माहिती करून , प्रश्नपत्रिकेचा अभ्यास करा, प्रत्येका असामान्य विद्यार्थ्या मध्ये ब्रेन असतोच या ब्रेन च्या सहायाने स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त होऊ शकते, आपल्यातील आत्मविश्र्वास दुनावला की संघर्ष सुद्धा ठेगना वाटतो, कला, वाणिज्य, विज्ञान, कृषी, वैद्यकीय, अभियांत्रिकी पदवी ही तितकीच तोलाची असुन ,आपल्या शिक्षणाचा उपयोग विद्यार्थ्यांनी समाज व राष्ट्राच्या प्रगतीसाठी करावा असे विचार व्यक्त केले.

## महालिंगआप्पा माळगे यांचे निधन



देगलूर(प्रतिनिधि): तालुक्यातील हानेगाव येथील वीरशैव समाजाचे ज्येष्ठ नागरिक महालिंगआप्पा संगायप्पा माळगे (वय ९१ वर्ष )यांचे आज दिनांक ६ मार्च रोजी पहाटे ४ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले.

आज बुधवार दुपारी ४ वाजता हनेगावं येथील त्यांच्या शेतात अंतिम संस्कार करण्यात येणार आहे.महालिंगअप्पा माळगे यांना सन १९८२ ला महाराष्ट्र शासनाने शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने सन्मानित केले होते.त्यांच्या पश्र्चात तीन भाऊ,दोन मुले,चार मुली,सूना,जावई,नातवंडे असा मोठा परिवार आहे.ते औरंगाबाद येथे विद्युत मंडळात कार्यरत शरद माळगे व हाणेगाव येथील सराफा व्यापारी महेश माळगे यांचे वडील होत.

# जबरी चोरी झाल्याचा बेबनाव करणारा फिर्यादीत निघाला आरोपी

धाराशिव दि.६ (प्रतिनिधी) - ट्रकमधील दीड लाख रुपयांचा माल अज्ञात चोरट्यांनी ट्रक अडवून लंपास केल्याची घटना धाराशिव तालुक्यातील ढोकी येथील रेल्वे फाटकाजवळ घडली असल्याचा बनाव ट्रूकचालकाने केला होता. मात्र पोलिसांनी तपासाची चक्री फिरवून पॉलिसी खात्यात दाखवितात फिर्यादीचा बनाव उघड झाला. त्यामुळे फिर्यादीत निघाला चोरटा याप्रमाणे त्या चोरीच्या मालासह फिर्यादीस पोलिसांनी बेड्या ठोकले आहेत.

याबाबत माहिती माहिती अशी की, सिताराम उर्फ सिध्दराम रामचंद्र जेरबंडे, (वय ३२ वर्षे), रा. विजापूर रोड आम्रपाली चौक, सोलापूर यांच्या ट्रॅकमधील रोख रक्कम दीड लाख रुपये हे दि.५ मार्च रोजी रात्री ढोकी रस्त्यावर रेल्वे फाटकाच्या पुढे अज्ञात तीन व्यक्तींनी जबरीने चोरुन नेले.



या प्रकरणी सिताराम जेरबंडे यांनी दि.६ मार्च रोजी दिलेल्या तक्रारीवरून ढोकी पोलीस ठाण्यात गुरनं ९५/२०२४ कलम ३९२, ३४ भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

गुन्ह्याचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने या ठिकाणी जाऊन त्या गुन्ह्यातील फिर्यादी सिताराम उर्फ सिध्दराम रामचंद जेरबंडे (वय ३२ वर्षे), रा. विजापूर रोड आम्रपाली चौक, सोलापूर यांच्याकडे सखोल चौकशी केली असता सदर घटने बाबत यातील फिर्यादी याच्यावर संशय बळावल्याने त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपुस केली असता त्यांनी प्रथमत: पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यास अधिक विश्र्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की, माझ्या मनात लालच निर्माण झाली. मला लोकांचे उसने पैसे देणे असल्याने मी माझ्या जवळील मालकाचे पैसे झाल्याचा बनाव रचून ते पैसे हडपण्याचा बेत आखून माझा मित्र हैदर मुजावर रा. सलगर वस्ती, झोपडपट्टी नं.२ सोलापूर यास बोलावून घेवून सदरचा गुन्हा मी व माझा मित्र यांनी केला असल्याची कबुली दिली. तसेच पोलीसांनी त्याच्या ताब्यातून गुन्ह्यातील गेलेला माल १ लाख ५० हजार रुपये रोख रक्कम हस्तगत केला. नमुद आरोपीस चोरीच्या मालासह ढोकी पोलीसांच्या ताब्यात दिले.

ही कामगीरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व अप्पर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली सथानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे, सचिन खटके, पोलीस हवालदार विनोद जानराव, समाधान वाघमारे, अमोल निंबाळकर, हुसेन सय्यद, नितीन जाधवर, बबन जाधवर, चालक मुजीब पठाण, आरब, अशोक कदम, सुनिल मोरे यांच्या पथकाने केली आहे.

पान १ वरून

## देशातील...

विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

पुणे मेट्रोलाही दाखवला हिरवा झेंडा

कोलकाता येथून पंतप्रधानांनी ऑनलाईन पद्धतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते निगडी, पुणे मेट्रोचे भूमिपूजन केले. याबरोबरच रुबी हॉल क्लिनिक ते रामवाडी, पुणे मेट्रोला प्रधानमंत्र्यांनी हिरवा झेंडा दाखवला. कोलकातानंतर ते बिहारसाठी रवाना झाले आहेत. बिहारमधील पश्चिम चंपारण जिल्ह्यातील बेतिया येथे त्यांची आज मोठी सभा होणार आहे.

## विचारपूर्वक...

आहे त्यांनी पुन्हा आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्यास कडक कारवाईला सामोले जावे लागू शकते.

## बेस्ट ऑफ...

भाजप अध्यक्ष ॲड. आशिष शेलार त्यांची पत्नी ॲड. प्रतिमा शेलार यांच्या सह जनाई भोसले, आनंद भोसले, व्हॅल्युएबल ग्रुपचे अमेय हेटे, अंकित हेटे जीवनगाणीचे प्रसाद महाडकर आणि पुस्तकाच्या डिझायनर नूतन आजगावकर आदी उपस्थित होते.

## घनसरगाव...

संघातील विकासाचे प्रश्न मार्गी लागत असल्याचा मनस्वी आनंद आहे असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, पक्षाने मला दिलेल्या आमदारकीच्या माध्यमातून गोरगरीब सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहे, केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून गावागावात वाडी वस्तीत विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून आणला, येणाऱ्या काळात होणाऱ्या निवडणुकीत नरेंद्रजी मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी लातूरचा भाजपाचा खासदार बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले.

प्रारंभी सरपंच महानंदाताई दरेकर आणि ॲड. निवृत्ती जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करून आ. रमेशआप्पा कराड यांच्यामुळे घनसरगावात विविध विकास कामासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी मिळाल्याचे सांगून येणाऱ्या काळात घनसरगाव येथील नागरिकांची त्यांच्या पाठीशी खंबीरपणे साथ राहील असे बोलून दाखवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी निखिल जाधव यांनी आभार मानले.

यांनी आभार मानले.

याप्रसंगी भाजपाचे हेमंत दरेकर, प्रवीण शिंदे, हनुमंत पवार, विजय चव्हाण, दत्ता सरवदे, संतोष राठोड, शेख अजीम, राजकुमार आलापूरे, गुणवंत पाटील, प्रकाश पवार, भारत शिंदे, सचिन शिंदे, रत्नमाला पवार, सुरेश जाधव, अनंत सूर्यवंशी, राजुदास राठोड, ओम मोरे, रवींद्र पवार, भानुदास राठोड, प्रकाश जाधव, रमाकांत कांबळे, बाळासाहेब राठोड, हरिभाऊ राठोड, चंद्रकांत पवार, साहेबराव शिंदे, अशोक शिंदे, वामन पवार, रामेश्वर सूर्यवंशी, रंगनाथराव शिंदे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते घनसरगाव येथील ग्रामस्थ महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संभाव्य...

तपासावी. तसेच जलवाहिनीमधून पाण्याची गळती होणार नाही, याची दक्षता घ्यावी. प्रत्येक गुरुवारी पाणी टंचाईची आढावा बैठक घेवून कृती आराखड्याची अंमलबजावणी करावी. तसेच शहरामध्ये अवैध पद्धतीने पाणी उपसा करणाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

सर्व नगरपरिषद आणि नगरपंचायत क्षेत्रांसह ग्रामीण भागातील पाणी पुरवठ्यासाठी संबंधित उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी, मुख्याधिकारी यांनी सामान्व्यायाने काम करून पाणी टंचाई निवारणाच्या उपाययोजना हाती घ्याव्यात. पिण्यासाठी पाणी आरक्षित केलेल्या सिंचन प्रकल्पांमधून इतर कारणांसाठी पाणी उपसा होवू नये, याची खबरदारी घ्यावी. यामध्ये कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिला. तसेच ग्रामीण भागात गावनिहाय पाणी टंचाई कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करावी. प्रत्येक जलस्त्रोत कधीपर्यंत वापरात राहील, याची माहिती संकलित करून त्यानुसार नियोजन करावे. सर्व हातपंप कार्यान्वित राहतील, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले. चारा टंचाईवर मात करण्यासाठी जिल्ह्यात पशुसंवर्धन विभागामार्फत पशुपालक शेतकऱ्यांना शुगर ग्रेसचे बियाणे वितरीत करण्यात आले. याबाबतचा आढावाही यावेळी घेण्यात आला. तसेच जिल्ह्याबाहेर चारा वाहतुकीवर बंदी घालण्यात आली असून त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी दिल्या. पाणी टंचाई निवारणासाठी तहसीलदार, गट विकास अधिकारी यांनी प्रत्यक्ष फिल्डवर जावून आढावा घेवून आवश्यक उपाययोजनांना प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत

मा.के.ए.पोवार,३ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर ,उदगीर यांचे न्यायालयासमोर
दिवाणी किरकोळअर्ज क्र.१५९/२०२४
निशाणी क्र.०७
ज्याअर्थी नामे ठालहरपवीर S/o Shivrudrappa Dulange and Kashibai W/o Ramchandra Dulange हे १०/०१/२००९ -पव ०६/०७/२०१५ -At Udgir येथे मयत झाले आहेत व अर्जदार R/0 Kumdal tq.udgir Dist Latur दि.२५/०४/२०१३रोजी at. Gurdhal tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार
1) Subhash S/o RamRamchandra Dulange,-ge-53,-Occu--Labour

2) Rajkumar S/o, Ram Urf Ramchandra Dulange,-ge-50,-Occu--Labour
Both R/o Udgir ,Tq.Udgir ,Dist. Latur.
3) Mangalbai W/o. Shivbasappa Wadji , -ge-58 -Occu-H.H. .R/o K.E.B. Colony,Bidar Dist.Bidar
4) Sunita W/0 Subhash Rasure, -ge--42 Occu-H.H. R/o -urad Shahajani, Tq.Nilanga,Dist.Latur.

यांनी खालिल नमुद हे मयताचे वारस असुन
1) Subhash S/o RamRamchandra Dulange,-ge-53,--Son
2) Rajkumar S/o, Ram Urf Ramchandra Dulange,-ge-50,--Son
3) Mangalbai W/o. Shivbasappa Wadji , -ge-58 -Daughter
4) Sunita W/0 Subhash Rasure, -ge--42--Daughter

अर्जदार यांनी Ramchandra S/o Shivrudrappa Dulange and Kashibai W/o Ramchandra Dulange या नावाचे त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Ramchandra S /o Shivrudrappa Dulange and Kashibai W/o Ramchandra Dulange यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांका०१/०३/ २०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढुल तारीख:-०६/०४/२०२४

आदेशावरुन
(ए.आर.गायकवाड ) (एस.एम.शेटे)
कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
३रे सह दिवाणी न्यायालय सहदिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर क.स्तर,उदगीर

## जाहीर प्रगटनाद्वारे समन्स

**उस्मानाबाद येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच न्यायालय**

**सीएनआर एमएचओएस०२.०००२६५२०२०**
**विशेष दिवाणी दाया क्र.०६/२०२०**
**धमकाबाई /वि./ महाराष्ट्र शासन व ईतर**
**प्रति, प्रतिवादी क्र.**
**निशाणी क्रमांक - ३३**

संजय रामचंद्र राठोड, रा. दिपकनगर तांडा कामठा ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद..... यांस

ज्याअर्थी जपरिनामिद वादी धमकाबाई रामचंद्र राठोड, वय- ५७ वर्षे, धंदा- मजुरी, रा. दिपक नगर तांडा कामठा ता. तुळजापुर ह.मु. हिप्परगा (रवा) ता. लोहारा जि. उस्मानाबाद यांनी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थी हा वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक (२६/०६/२०२४ रोजी दिवसा ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरीत्या सुचता दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तरे देउ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नाचे देउ शकणारे एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याव्दारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याव्दारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचार किंवा उलट वाद (सेंट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रण खाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेंट ऑफ) किंवा प्रतिवाद(काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाली असलेले किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सुची करुन ती सुची तुमच्या बचावाच्या लेखी निक बस जोडावी. तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसुर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात गेल आहे की, वर नमुद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरीता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसुर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल

आज दिनांक १५.०६.२०२३
रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
पुढील तारीख २६/६/२०२४

**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद**

## जाहीर प्रगटन

**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी रेणापूर यांचे कार्यालय (दंडणिय विभाग)**

---

**मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र जाहिरनामा**

**जा.क्र. २०२४/ दंडणीय/कावि**
**विषय- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३(३) अन्वये जन्म नोंदणी आदेश होणेबाबत.**

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार श्री बालाजी त्र्यंबकराव लहाने रा. माकेगाव ता. रेणापूर जि. लातूर यांनी त्यांची आई श्रीमती गवळणबाई त्र्यंबकराव लहाने यांचा मृत्यू दि. १४/०३/२०१८ रोजी माकेगाव येथे राहत्या झाला असल्याने मृत्यू तारखेची नोंदणी ग्रामपंचायत कार्यालय माकेगाव येथे करणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी, सदर जन्म/मृत्यु तारखेच्या नोंदणीसाठी कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्या सदर कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप अथवा हरकत सादर न झाल्यास हे न्यायालय अर्जामध्ये योग्य तो आदेश पारीत करील. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही. सदरचे जाहीर प्रगटन हे आज दिनांक ०४/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी दिले,
पुढील तारीख दिनांक ३१/०४/२०२४

**स्वाक्षरीत**
**तालुका दंडाधिकारी रेणापूर तथा**
**तहसिलदार रेणापूर**

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत

मा.के.ए.पोवार,२रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर ,उदगीर यांचे न्यायालयासमोर
दिवाणी किरकोळअर्ज क्र.१५८/२०२४
निशाणी क्र.०७
ज्याअर्थी नामे Madhave Shivappa Kapale ho R/0 Kumdal tq.udgir Dist Latur दि.२५/०४/२०१३रोजी at. Gurdhal tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत.
व अर्जदार
1)Shivkata W/o.Mahadev Hale, -ge--31
2) -lka W/o.Basweshwar Gore, -ge--29
3) Hanmant S/o. Madhav Kapale , -ge-24 -Occu--gri .R/o Kumdal (U) Tq.Udgir Dist.Latur
4) -shwini W/0.Prashant Gond, -ge--18
खालिल नमुद चार व्यक्ती हे मयताचे वारस असुन
1)Shivkata W/o.Mahadev Hale, -ge--31--Daughter
2) -lka W/o.Basweshwar Gore, -ge--29--Daughter
3) Hanmant S/o. Madhav Kapale , -ge-24 -Son
4) -shwini W/0.Prashant Gond, -ge--18 Daughter

अर्जदार यांनी Madhave Shivappa Kapale या नावाचे त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Madhave Shivappa Kapale यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांका०४/०३/ २०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढुल तारीख:-०८/०४/२०२४

आदेशावरुन

(के.डी. सीर्यवंशी ) (एस.एम.शेटे)
कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
२रे सह दिवाणी न्यायालय सहदिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर क.स्तर,उदगीर

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत

मा.के.ए.पोवार,२रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर ,उदगीर यांचे न्यायालयासमोर
दिवाणी किरकोळअर्ज क्र.११६/२०२४
निशाणी क्र.०७
ज्याअर्थी नामे Vimalbail Vishnudasji Sarda ho R/0 udgir tq.udgir Dist Latur दि.१८/०१/२०२४रोजी at. Manvat tq.Manvat Dist.Parbhani येथे मयत झाले आहेत. व अर्जदार
१)Shobha W/o.Balaprasad Baheti, -ge--64,Occ.-H.H. R/o Udgir Tq.Udgir Dist.Latur
2) -sha W/o.Madhusudhan Chandak, -ge--59,Occu--H.H.
3)Santoshi W/o. Satynarayan Mundada, -ge-58 -Occu-H.H.R/o Bibewadi, Haveli Pune
4)Jayshri W/0.Sanjay Lahoti, -ge--54-,Occu.-H.H. R/o Somesh Colony Nanded Tq.Dist.Nanded
5) Vishnudas S/o. Ganeshlala Sarda ,-ge--74---gri R/o.Basweshwar Chok ,Udgir,Dist.Latur
खालिल नमुद पाच व्यक्ती हे मयताचे वारस असुन
1)Shobha W/o.Balaprasad Baheti, -ge--64--Daughter
2) -sha W/o.Madhusudhan Chandak, -ge--59--Daughter
3)Santoshi W/o. Satynarayan Mundada, -ge-58 -Daughter
4)Jayshri W/0.Sanjay Lahoti, -ge--54- Daughter
5) Vishnudas S/o. Ganeshlala Sarda ,-ge--74--Husband

अर्जदार यांनी Vimalbail Vishnudasji Sarda या नावाचे त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू तळारश्रलरळश्र तळीहर्पीवरीक्षळ डरीवर यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांका०५/०३/ २०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढुल तारीख:-०२/०४/२०२४

आदेशावरुन
(के.डी. सीर्यवंशी ) (एस.एम.शेटे)
कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
२रे सह दिवाणी सहदिवाणी न्यायालय
न्यायालय क. स्तर,उदगीर क.स्तर,उदगीर


# सुर्य कल्याण मुंबई रात्र

स्पेशल ४५/७८

| ५ | ८ | ९ |
|---|---|---|
| १४० | ३७८ | ४५० |
| ५२-५७ | ८०-८५ | ९१-९६ |

प्रो. दिपक कुमार

स्पेशल चान्ससाठी मेंबरशिप नोंदणी चालू आहे. संपर्क साधावा.

१००% चान्स पास होणार

## गोल्डन विकली चान्सेस

मिलन (उदय/अस्त)(शनिवार)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३९० | ६ | २४० | ० | १४५ |
| | ४८० | | २६८ | | २३५ |
| | २२८ | | ३३० | | ५५० |
| | ९२-२१ | ३६-६७ | | ८०-०४ | |

कल्याण(उदय/अस्त)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १३९ | १ | १४६ | ८ | १२५ |
| | २३८ | | ४७० | | २६० |
| | ६७० | | १०० | | ४४० |
| | ९३-३२ | ०१-१४ | | ७८-८६ | |

ता.२५ व २९ चे जबरदस्त चान्ससाठी
संपर्क करा
सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारी आहे. कृपया दुरुपयोग करु नये.
मोबा-९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

दिवाळी बंपर चालू आहे 99 75 47 98 26




# यशवंत

गुरुवार दि. ७ मार्च २०२४

उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


## कॉपी मुक्तीसाठी सहकार्य करावे ; तहसीलदार सुरेखा स्वामी

अतनूर / प्रतिनिधी- २१ फेब्रुवारी ते १९ मार्च २०२४ या कालावधीत महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळ मार्फत परीक्षा घेण्यात येत आहेत. तसेच दि.१ मार्च ते दि.२६ मार्च कालावधीत माध्यमिक शालांत परीक्षा इयत्ता दहावी बोर्डाची परीक्षा या अनुषंगाने तालुक्यातील अतनूर येथील श्रीराम माध्यमिक आश्रमशाळा चिंचोली, उच्च माध्यमिक आश्रमशाळा शिवाजीनगरतांडा मेवा-पूर येथील सेंटर केंद्र अंतर्गत कॉपीमुक्त अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन तहसीलदार सौ. सुरेखा स्वामी यांनी केले. यापूर्वीच सौ.वर्षा ठाकूर-घुगे जिल्हाधिकाऱ्यांकडून महसूल, ग्रामविकास, शिक्षण व पोलीस विभाग यांच्या बैठकीत सूचना करण्यात आल्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थी व विद्यार्थिनी कॉपीसह आढळून आल्यास त्यांच्यावर दंडात्मक व फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. यावेळी त्यांनी उच्च माध्यमिक आश्रम शाळा शिवाजीनगरतांडा मेवापूर व श्रीराम प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा चिंचोली अतनूर भेटी देत पाहणी केली व सर्व विद्यार्थ्यांना सक्त सूचना दिल्या यावेळी बैठे पथक, भरारी पथक यांनाही सक्त ताकीद देण्यात आली.

# आई-वडिलांची मान खाली झुकू देऊ नका: डॉ. प्रा. वसंत हंकारे

देवणी (प्रतिनिधी) आयुष्यामध्ये असंख्य चुका करत आपण घडत असतो. आपण कष्टाला आव्हान देत मनातला निश्र्चय पूर्ण करत . आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करत गगनात भरारी घेऊन सोनेरी आयुष्य घडवू आणि समाजात कुटुंबाची मान उंचावेल अशी कामगिरी करा . एक आदर्श भारतीय नागरिक व्हा. मनातील घुसमूट करणाऱ्या चुका एका कागदात लिहून त्या होम मध्ये जाळण्यात याव्यात असेही यावेळी ते म्हणाले.

आयुष्यात सतत चुका होणार नाहीत याचे भान मनातशी ठेवा. आई-वडिलांच्या कष्टाचे सोने करण्यासाठी आयुष्याला घडविण्यासाठी आपण कष्ट करायला हवेत प्रतिपादन धडाकेबाज व्याख्याते डॉक्टर प्राध्यापक वसंत हंकारे यांनी केले आहे. देवणी येथील साई प्रतिष्ठान आयोजित देवणी कला क्रीडा महोत्सवानिमित्त धडाकेबाज व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष मलिकार्जुन आप्पा मानकरी सावकार तर प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष डॉ ,कीर्तीताई घोरपडे, माजी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष भगवानराव पाटील विजय नगरकर, माझी महिला बालकल्याण सभापती कुशवरताताई बेळे, देवणी पंचायत समितीचे माझी



उपसभापती प्राचार्य यशवंत पाटील देवणीकर, देवणी नगरीचे माजी सरपंच काशिनाथ मानकरी, माजी सरपंच अंकुश भाऊ गायकवाड बोंबळीकर, देवणी शहरातील उद्योगपती शेषराव मानकरी ज्येष्ठ नागरिक शिवराजप्पा बिरादार, कांतराव अंबुलगे, वैजनाथ लुल्ले, जावेद तांबोळी, महादेव मळभगे, गोपाळ बिरादार, अतिश बनसोडे, ओमकार मजगले, सुमित पाटील विजयनगरकर. उपस्थित होते. ज्या समाजात आपण जन्माला आलो त्या समाजाचे काहीतरी आपण देणे लागतो. ते देणे संस्काराच्या देवणी फेस्टिवल चे आयोजन करत . देवणी तालुक्यातील संस्कारीत पिढी निर्माण करण्यासाठी सर्वांना ज्ञानदानाचे कार्य करत . तालुक्यातील नव्या पिढीला संस्कार शिल्प घडवण्याचे काम देवणी फेस्टिवलचे संस्थापक अध्यक्ष मल्लिकार्जुनप्पा मानकरी सावकार हे करीत आहेत. देवणी शहरात नवीन पिढी उत्तम संस्काराची ज्ञानाची कास धरणारी , व तत्व , आणि देशभक्तीची आवड निर्माण करणारी पिढी , घडविण्यासह देवणी फेस्टिवल कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा सार्थ अभिमान वाटतो असे वसंत हंकारे म्हणाले . सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजक बबन कांबळे , शिवानंद कांबळे, सत्यजित कांबळे, शुभम सोनवणे, ओमकार पांचाळ, संदीप सूर्यवंशी, केदासे अभिजीत, सचिन भातंबरे, भिम बोरे, स्वप्निल कांबळे, ईश्र्वर बावस्कर, किरण गायकवाड, विवेक कांबळे, विकास सूर्यवंशी, नितीन गवारे, कृष्णा रोटे, संतोष वालेकर, गजेंद्र पांचाळ, सुरज पतंगे, स्वप्निल कांबळे आदींनी परिश्रम घेऊन सदरचा कार्यक्रम यशस्वी केले.

# ग्रंथालय हे ज्ञान प्राप्त करण्याचे स्त्रोत-डॉ.शेषनारायण जाधव



उदगीर :- आज महिती व तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आपल्याला ज्ञान प्राप्त करण्याचे मुबलक साधने उपलब्ध असले तरी एखाद्या विषयाचे परिपूर्ण ज्ञान आणि सखोल अभ्यास करण्यासाठी ग्रंथालयातच जावे लागते.कारण ग्रंथालय हे ज्ञान प्राप्त करण्याचे प्रमुख स्त्रोत आहे. आजघडीला विद्यार्थी हे सामजिक माध्यमातून (सोशल मीडिया) मिळणाऱ्या अर्धवट ज्ञानावर अवलंबून राहत आहे.ग्रंथालयात जाऊन पुस्तके ची देवाण घेवाण करून वाचत बसायला वेळ नाही हि आजची परिस्थिती आहे. परंतु असे असले तरी विद्यार्थ्यांना जीवनात यश संपादन करायचे असेल तर वाचन करावे लागेल. असे मत स्वामी विवेकानंद महाविद्यालय उदगीर येथील ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.शेषनारायण जाधव यांनी केले.

येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित स्वामी विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस) विभागाच्या वतीने आयोजित विशेष वार्षिक शिबीर दिनांक ०१ मार्च २०२४ ते ०७ मार्च २०२४ दरम्यान मौजे देवर्जन (हत्तीबेट),हणमंतवाडी ता. उदगीर येथे होत आहे. या शिबिरातील दि. ३ मार्च रोजी बौद्धिक सत्रात ग्रंथालयाचे बदलते स्वरूप या विषयावर ते बोलत होते. यावेळी व्यापीठावर रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अमर तांदळे, प्रा. आकाश कांबळे यांच्या सह स्वयंसेवक उपस्थित होते.

# लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालययाच्या तब्बल १४ विद्यार्थ्यांना पारितोषिक प्राप्त



लातूर / प्रतिनिधी- लाल बहादुर शास्त्री माध्यमिक विद्यालय उदगीर येथे, इस्कॉन तर्फे श्रीमदभगवतगीता पाठांतर लेखी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विद्यालयाने भरघोस यश प्राप्त केले.उत्कृष्ट सहभागी शाळा म्हणून प्रथम पारितोषिक, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह विद्यालयाला प्राप्त झाले. स्पर्धेत सर्वप्रथम क्रमांकाची सायकल व प्रमाणपत्र देवव्रत रमेश माने या विद्यार्थ्याला प्राप्त झाले. चौथ्या क्रमांकाचे दोन हजार रुपयाचे पारितोषिक साक्षी श्रीकांत कुलकर्णी ला प्राप्त झाले. तर सातव्या क्रमांकाचे टी-शर्ट कृष्णा शिवाजी हंचनाळे या विद्यार्थ्याला प्राप्त झाले.

तसेच वीरेंद्र विष्णू तेलंगे,पृथ्वीराज उटकुरे,अंकिता मोरतळे,पृथ्वीराज पाटील, नीलकृष्ण माने,आर्यही जाधव, सोमेश्वर लिंबाळे,स्नेहा केंद्रे,सायली पाटील, अंबिका ढोबळे यांनाही विशेष पारितोषिक प्राप्त झाले.

याबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. श्रीमद् भगवद्गीता स्पर्धेचे प्रमुख म्हणून विद्यालयातील नीता मोरे व किरण नेमट या शिक्षकांचा सत्कार,केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह श्री शंकरराव लासुणे, प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष व्यंकटराव गुरमे,माध्यमिक शालेय समितीचे पूर्व अध्यक्ष संतोष कुलकर्णी , माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अंबादास गायकवाड, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे ,उपमुख्याध्यापक संजय कुलकर्णी, पर्यवेक्षक माधव मठवाले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे, पर्यवेक्षक लालासाहेब गुळभिले, कृष्णा मारावार यांनी शुभेच्छा दिल्या.

# दयानंद कला महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागाची पल्स पोलिओ मोहीम

लातूर / प्रतिनिधी- भारत पोलिओ मुक्त आहे. परंतु काही देशांमध्ये पोलिओ अजूनही असल्याने तो पुन्हा येऊ शकतो. आपल्या बालकांचा संपूर्ण सुरक्षितेसाठी खात्री करून घ्या, पोलिओचा डोस प्रत्येक वेळी घ्या, पोलिओवर मात करण्यासाठी देशाला मदत करा. दोन थेंब प्रत्येक वेळी पोलीओ वर विजय दरवेळी. असे आव्हानात्मक घोषवाक्य देऊन, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. संलग्नित, दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद कला महाविद्यालय, लातूर. राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम २०२४. अंतर्गत महाविद्यालयातील रा.से.यो स्वयंसेवकांनी ग्रामीण भागातील लोकांमध्ये पल्स पोलिओची जनजागृती करून पाच वर्षाखालील वयोगटातील बालकांना पोलिओचे डोस दिले. ते खालील प्रमाणे.

# शकुंतलादेवी बनसोडे प्राथमिक व माध्य. आश्रमशाळा शेकापूर चे सूर्यनमस्कार स्पर्धेत यश



उदगीर / प्रतिनिधी- पतंजली योग समिती उदगीर व ज्येष्ठ नागरिक संघ उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे (रथसप्तमी) जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त जिल्हा परिषद मैदान उदगीर येथे दिनांक १६/२/२०२४ रोजी स.८.०० वाजता आंतरशालेय सामूहिक सूर्यनमस्कार स्पर्धा घेण्यात आल्या. सामूहिक सूर्यनमस्कार स्पर्धेसाठी उदगीर व परिसरातील ग्रामीण व शहरी अशा एकूण २१ शाळांनी सहभाग नोंदवला होता.

सदरच्या आंतरशालेय सामूहिक सूर्यनमस्कार स्पर्धेमध्ये शेकापूर येथील शकुंतलादेवी बनसोडे प्राथमिक व माध्य.आश्रम शाळेच्या संघाने सूर्यनमस्कार स्पर्धेतील मूल्यांकनाच्या सर्व निकषांचे पालन करीत उपस्थित सर्व शाळेच्या संघामधून सर्वाधिक गुण मिळवून ग्रामीण व शहरी गटातून एकत्रितपणे सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे. सूर्यनमस्कार स्पर्धेमध्ये शाळे तील एकूण ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी सर्वांग सुंदर व्यायाम सूर्यनमस्कारातील सर्व आसनांचे उत्कृष्ट सादरीकरण करीत उपस्थितांची मने जिंकली.इयत्ता ६ वी तील वाघमारे आनंद सतीश याने सूर्यदेवतेचे प्रतिरूप हे सुंदर वेशभूषा व कलात्मकतेने साकारले.सूर्यनमस्काराचे ढोल संचलन इयत्ता ७ वी तील प्रेमनाथ देवकते यांनी केले तर मंत्र उच्चारणाचे संचलन इयत्ता ७ वी तील सुमन देवकते या विद्यार्थिनीने केले. शाळेचे मुख्याध्यापक तथा मुख्य योगशिक्षक श्री.कप्पीकेरे व्ही.जी. यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विभागीय पोलीस अधिकारी दिलीप भागवत, पोलीस उपनिरीक्षक अभय पाटील,भाजपाचे उदगीर शहर अध्यक्ष मनोज पुदाले,मारवाडी युवा मंचचे पवन मुंदडा,श्रीनिवास सोनी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रा. रमाकांत मध्वरे,पतंजली योग समितीचे समिती उदगीरचे अध्यक्ष सुरेंद्र अक्कनगिरे, सचिव श्रीराम चामले,ग्रंथमित्र दिपक बलसुरकर,अनिल पत्तेवार,उमाकांत अंबेसंगे,नरेंद्र यंदे,धनराज बिराद-र इ. मान्यवरांच्या हस्ते सद-रील स्पर्धेतील विजेत्या संघाचे बक्षीसांचे वितरण करण्यात आले.या यशाबद्दल संस्थेचे सचिव श्रीधर राठोड,अध्यक्ष ए. एस. राठोड,शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व गावकरी मंडळींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.


Dnyandeep Udaygiri Bahuuddeshiya Sevabhavi Sanstha's

**Mount Litera Zee School, Udgir**

SURVEY NO 69 B, YENKI - MANKI ROAD, NEAR RING ROAD, MADLAPUR, UDGIR - 413517 DIST. LATUR, MAHARASHTRA.

**RECRUITMENT**

Applications are invited for the following positions for the academic year 2024-25.

| POSITION | SUBJECT | QUALIFICATION |
|---|---|---|
| NTT (Pre-Primary) | MOTHER TEACHER | ANY GRADUATE WITH MONTESSORI / ECCE / D.Ed TRAINING. |
| TGT | ENGLISH<br>HINDI<br>MARATHI<br>MATHEMATICS<br>SCIENCE<br>SOCIAL SCIENCE | GRADUATE / POST GRADUATE IN THE RELEVANT SUBJECT WITH B.Ed / M. Ed |
| IT INSTRUCTOR | COMPUTER SCIENCE | GRADUATE / POST GRADUATE IN COMPUTER SCIENCE /APPLICATION |
| PTI / PET | PTI / PET | B.P.Ed / M.P.Ed |
| MUSIC TEACHER | MUSIC | GRADUATE IN MUSIC / SANGEET VISHARAD |
| DANCE TEACHER | DANCE | GRADUATE IN DANCE |
| ADMINISTRATION | ADMIN HEAD | MBA IN MANAGEMENT / HR |
| | ACCOUNTANT | COMMERCE GRADUATE / POST GRADUATE WITH ACCOUNTING SOFTWARE'S |
| | IT EXECUTIVE | COMPUTER GRADUATE WITH KNOWLEDGE OF IT / HARDWARE /SOFTWARE |
| | FRONT DESK OFFICER | ANY GRADUATE WITH FLUENCY IN ENGLISH, HINDI, MARATHI |
| NURSE | NURSE | DIPLOMA IN GNM / B.Sc (NURSING) |
| COUNSELLOR | COUNSELLOR | GRADUATE / POST GRADUATE IN PSYCHOLOGY |
| TRANSPORT | BUS-DRIVERS | SSC / HSC WITH PSV BADGE NUMBER |
| OFFICE SUBORDINATES | CARE TAKER / ATTENDER | SSC / HSC |

Candidates who are fluent in English, hardworking, experienced and having flair for innovative teaching are preferred.

ZEE LEARN

Drop your CV on mlzs.udgir@mountlitera.com by 08.03.24

Interview Date : 10.03.2024. from 10.00 AM to 04.00 PM

Contact 8432870300 / 8432770300

PRINCIPAL SECRETARY PRESIDENT


**टीसी हरवली आहे**

देवकते पूजा गोविंद या नावाची बारावी पास ची टीसी उदगीर -देवणी प्रवासात हरवली आहे.

संपर्क क्रमांक : ८४९७९५८११३

# राष्ट्रीय विद्युत सुरक्षा दिन व लाईनमन दिवस विविध उपक्रमांनी साजरा

अतनूर / प्रतिनिधी -देशभरातील लाईनमनबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केंद्र शासनाने ४ मार्च २०२३ रोजी देशभरात लाईनमन दिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. ४ मार्च रोजी महावितरणमध्ये सर्वत्र लाईनमन दिवस साजरा करण्यात येतो असून त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे लातूर परिमंडळात आयोजन करण्यात आले आहे.

जनमित्र म्हणजेच लाईनमन हा महावितरणच्या व्यवस्थेमधील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. महावितरणचे जनमित्र ऊन, वारा, पाऊस तसेच इतरही अत्यंत खडतर परिस्थितीत ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठ्यासाठी ते चोवीस तास सेवा देतात. त्यांच्या या कामाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या दिवसाचे आयोजन करण्यात आले आहे. यात महावितरणच्या राज्यभरातील प्रादेशिक व परिमंडळ स्तरावर आयोजित मुख्य कार्यक्रमांमध्ये नियमित व बाह्यस्त्रोत महिला व पुरुष लाईनमनचा प्रादेशिक संचालक व मुख्य अभियंता यांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे.

याशिवाय ग्रामीण भागात विभाग कार्यालयाचे कार्यक्षेत्र विस्तारलेले व दुर्गम आहे अशा विभागांतील उपविभाग कार्यालय किंवा अतिदुर्गम शाखा कार्यालयांमध्ये दिवंगत ग्राहकतीर्थ बिंदुमाधव जोशी यांच्या ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्याचे लातूर जिल्हासंघटक तथा ग्राहक संरक्षण परिषदेचे शासन नियुक्त अशासकीय सदस्य बाल-ासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, पोलीस दक्षता समिती महाराष्ट्र राज्याचे मराठवाडा अध्यक्ष बी.जी.शिंदे अतनूरकर, युवा ग्रामीण पत्रकार संघ, जनक्रांती डोंगरी विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अतनूरचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष एस.बी. जी.शिंदे, विद्युत मित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे यांच्याकडून स्वतंत्रपणे लाईनमन दिवसाचे आयोजन करण्यात आले. यावेळी राम गुंडाप्पा बिरादार कनिष्ठ अभियंता महावितरण तसेच उपकार्यकारी अभियंता वाघमारे सर यांच्यासह १३ लाईनमन संतोष शिंदे, चंद्रकांत ओमप्रकाश पांचाळ, डी.आर.भूषणवाड, एम.एम.राऊतवाड, एकनाथ सगर, आचार्य सुधीर, अमित अत्रे, बालाजी केंद्रे, महेश मुळे, संदीप बिराद-ार, विशाल सूर्यवंशी, आकाश तेलंग, माधव पाटील सी.ओ.पांचाळ यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यानिमित्त अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर म्हणाले की, विद्युत सुरक्षा नियमांचे पालन करण्याचे तसेच ग्राहकांनी वीजबिल भरून सहकार्य करण्याचे आव्हान यादरम्यान सर्व ग्राहक जनतेला करण्यात आले.